# गावविकासासाठी एकजूटच यशाचा मंत्र : इंदोरीकर

**इगतपुरी : (समर्थ गांवकरी)**



पर्यावरण, शिक्षण, बालसंगोपन, महिला-बालविकास, रोजगार, स्वच्छता, वृक्षारोपण, तंत्रज्ञान, शेती आणि स्वयंरोजगार या सर्व क्षेत्रांमध्ये नियोजनबद्ध काम झाले तरच गावाचा सर्वांगीण विकास शक्य आहे. मात्र गट-तटाच्या राजकारणामुळे गावाचा नाश होतो, त्यामुळे मतभेद विसरून सर्वांनी एकत्र काम करण्याची गरज आहे, असे मार्गदर्शन प्रसिद्ध कीर्तनकार निवृत्तीमहाराज इंदोरीकर यांनी केले.

नाशिक जिल्हा परिषद आयोजित मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाच्या विशेष जनजागृती कार्यक्रमात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. या कार्यक्रमाला ग्रामपंचायत पदाधिकारी, स्थानिक नागरिक, महिला बचतगट सदस्य, युवक तसेच विविध संस्थांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान यावेळी खेड ग्रामपंचायतने एक ते आठ या काळात इंडिकेटर प्रमाणे कामे केले असल्याची माहिती ग्रामविकास अधिकारी पुष्पा धिंडळे यांनी दिली आहे. कार्यक्रमचे आयोजन खेड ग्रामपंचायतच्या वतीने करण्यात आले होते.

इंदोरीकर महाराज पुढे म्हणाले की, गावात विकासकामांसाठी निधी, योजना आणि शासकीय सुविधा उपलब्ध असल्या तरी त्याचा योग्य उपयोग करण्यासाठी गावकऱ्यांमध्ये परस्पर विश्वास व सहकार्य आवश्यक आहे. एकमेकांच्या उणिवा काढण्यापेक्षा ताकदीचा वापर करून सामूहिक प्रगती साधली पाहिजे. गावातील युवकांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेती, व्यवसाय आणि शिक्षण क्षेत्रात नवे प्रयोग केले तर रोजगारनिर्मिती वाढेल व स्थलांतर कमी होईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

महिला सक्षमीकरणावर बोलताना त्यांनी सांगितले की, बचतगट, कौशल्य प्रशिक्षण व स्वयंरोजगार योजनांमुळे महिलांना आर्थिक स्वावलंबन मिळते आणि त्यामुळे संपूर्ण कुटुंबाची प्रगती होते. स्वच्छता व वृक्षारोपण ही केवळ मोहिमा नसून जीवनशैली बनली पाहिजे; स्वच्छ व हिरवेगार गाव हेच खरे आरोग्यदायी गावाचे लक्षण आहे, असेही ते म्हणाले.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांना गावविकासासाठी एकजुटीने काम करण्याचा संकल्प करवून घेण्यात आला. सर्वांनी राजकीय मतभेद बाजूला ठेवून गावाच्या प्रगतीसाठी हातात हात घालून काम केले तर निश्चितच आदर्श गाव घडेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

यावेळी खासदार राजाभाऊ वाजे, माजी आमदार पांडुरंग गांगड, माजी आयुक्त चंद्रकांत खाडे, सिमंतनी कोकाटे, माजी उपसभपती पांडुरंग वारुंगसे, गटविकास अधिकारी चिमा गोडे, संपत काळे, ग्रामविकास अधिकरी पुष्पा धिंदाळे, तलाठी प्रियंका गांगुर्डे, माजी जिप सदस्य सुजाता वाजे, सुनील वाजे, माजी सरपंच जयश्री कचरे, माजी सरपंच अशोक वाजे, बाळासाहेब वाजे, अंकुश वाजे, सिंधुताई वाजे, रतन बांबळे, ॲड शिवाजी वाजे, बाळासाहेब वाजे, जगन वाजे, रामदास वाजे, त्र्यंबक घोलवड, सुधाकर जगताप, राजाराम वाजे, सागर वाजे, संतोष अस्वले, विनोद वाजे, बारकू वाजे, काशिनाथ कोरडे, शांताराम गभाले, तसेच इंगतपुरी तालुक्यातील सर्व ग्रामसेवक व संघटना, महिला बचत गट, जिल्हा परिषद शाळा, आरोग्य कर्मचारी व खेड ग्रामपंचायतचे सर्व कर्मचारी उपस्थित होते.

# उद्योजकाकडुन खंडणी घेणारा आरोपी जेरबंद

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**




याबाबतची माहिती अशी की, गेल्या दि ९ रोजी ९.३० वा.चे सुमारास निंबळक एम. आय. डी. सी प्लॉट नं. ०७ व ०८ येथे सुयश मेटल प्रोसिंग्स प्रा. लि. येथे अखिल भारतीय कामगार सेनेचे भाऊसाहेब उर्फ सदानंद दयानंद उनवणे, राजेश पाटील व त्याचे इतर ४ अनोळखी इसमांनी बेकायदेशीरपणे कंपनीमध्ये प्रवेश केला. कंपनीचे मॅनेजर प्रकाश जनार्दन कोकाटे यांना शिवीगाळ व दमदाटी करुन काम बंद करण्यास लावुन काम चालु करायेच असेल, तर दर महिन्याला एक लाख रुपये द्यावे लागतील, अन्यथा तुला व तुझ्या मालकाला जिवे ठार मारुन टाकु असे म्हणुन खंडणी मागुन मॅनेजर प्रकाश कोकाटे यांचेकडुन दमदाटी करुन वीस हजार रुपयेची खंडणी घेतली. तसेच त्यांनी सर्व कामगारांना बोलवुन त्यांचे अखिल भारतीय कामगार संघटनेस मान्यता देणेबाबत चिथावणी दिली होती. त्यानंतर निंबळक एम. आय. डी. सी येथील कंपनीचे उद्योजकांनी सदर घटनेबाबत मा. श्री सोमनाथ घार्गे, पोलीस अधीक्षक, अहिल्यानगर यांची प्रत्यक्ष भेट घेवुन संबंधीत इसमाविरुध्द कारवाई करणे बाबत निवेदन दिले.

तसेच "मा. मुख्यमंत्री साहेब, महाराष्ट्र राज्य यांनी एम.आय. डी.सी मधील कंपनीचे उद्योजकांना कोणी त्रास देत असले, तर त्यांना कायद्याने ठोकुन काढा" असे अहिल्यानगर जिल्हा दौ-याचे वेळी सुचना दिली होती.

त्याप्रमाणे मा. पोलीस अधीक्षक, अहिल्यानगर यांनी निंबळक एम.आय.डी.सी. येथे सुयश मेटल प्रोसिंग्स प्रा. लि.या कंपनीकडुन दमदाटी करुन खंडणी घेतलेल्या अखिल भारतीय कामगार सेनेचे भाऊसाहेब उर्फ सदानंद दयानंद उनवणे, राजेश पाटील व त्याचे इतर ४ अनोळखी इसमांविरुध्द गुन्हा दाखल करणे बाबत आदेश दिल्याने वरील आरोपीविरुध्द एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशन गु.र.नं. 118/2026 भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 308(5), 308(4), 329(4), 189(2), 191(2), 190, 325, 351(2), 324(3) प्रमाणे गुन्हा करण्यात आला आहे.

# पे-अँड-पार्क व नो-हॉकर झोन प्रस्तावास तीव्र विरोध

**अहिल्यानगरः (समर्थ गांवकरी)**



अहिल्यानगर महानगर पालिकेकडून शहरातील विविध भागात प्रस्तावित करण्यात आलेल्या पे-अँड-पार्क, नो-पार्किंग व नो-हॉकर झोन निर्णयाविरोधात नगरसेवक योगीराज शशिकांत गाडे यांनी आज महानगरपालिका आयुक्त यांची प्रत्यक्ष भेट घेऊन लेखी निवेदन सादर केले. शहरातील सर्वसामान्य नागरिक, लहान व्यावसायिक, हातगाडीधारक व फेरीवाले यांच्यावर हा निर्णय अन्यायकारक ठरणार असल्याचे त्यांनी निवेदनात नमूद केले आहे. सध्या शहरातील अनेक मुख्य रस्ते खोदकामामुळे अडचणीत आहेत. वाहनसंख्या प्रचंड वाढलेली असताना पार्किंगसाठी पुरेशी जागा उपलब्ध नाही. अशा परिस्थितीत पे-अँड-पार्कच्या माध्यमातून नागरिकांवर अतिरिक्त आर्थिक बोजा टाकणे योग्य नाही, अशी ठाम भूमिका त्यांनी मांडली.

तसेच प्रस्तावित नो-हॉकर झोनमुळे शेकडो कष्टकरी विक्रेत्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण होणार आहे. पुनर्वसनाचा ठोस आराखडा नसताना थेट निर्बंध लादणे अमानुष असून त्यांच्या कुटुंबाचा रोजीरोटीचा प्रश्न निर्माण होईल. "या कष्टकरी लोकांना पर्यायी जागा किंवा रोजगार कोण देणार?" असा सवालही नगरसेवक गाडे यांनी उपस्थित केला आहे.

महानगरपालिकेने प्रथम शहरातील पार्किंग क्षमतेचा अभ्यास अहवाल जाहीर करावा, बाधित विक्रेत्यांच्या पुनर्वसनाचा आराखडा स्पष्ट करावा व सर्व लोकप्रतिनिधी, व्यापारी संघटना व फेरीवाला संघटनांसोबत चर्चा करून निर्णय घ्यावा, अशी मागणी त्यांनी केली आहे. महसूलवाढीच्या नावाखाली सर्वसामान्य नागरिकांची लूट होऊ देणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला. नागरिकांच्या न्याय्य हक्कांसाठी आवश्यक असल्यास लोकशाही मार्गाने आंदोलन उभारण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. अहिल्यानगरच्या सर्वसामान्य नागरिकांच्या व कष्टकरी घटकांच्या हितासाठी हा प्रस्ताव तात्काळ स्थगित करून पुनर्विचार करावा, अशी ठाम भूमिका नगरसेवक योगीराज गाडे यांनी घेतली आहे.

# हर्षवर्धन सकपाळ यांचा निषेध

**तामसाः (समर्थ गांवकरी)**

हदगाव येथे भारतीय जनता पक्षाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांची तुलना टिपू सुलतान ची करून त्यांना समकक्ष ठरवण्याचा जो दुर्दैवी व आक्षेपार्ह प्रकार काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सकपाळ यांनी केला ते केवळ ऐतिहासिक अज्ञानच नव्हे तर महाराष्ट्राच्या अस्मितेवर थेट घाला आहे.छत्रपती शिवाजी महाराजांची तुलना जबरदस्तीने धर्मांध राजवटीचे प्रतिनिधित्व करणाऱ्या टीपू सुलतानशी करणं म्हणजे इतिहासाचा अपमान आहे.काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षांनी केलेल्या या विधानाबद्दल संपूर्ण महाराष्ट्रातून तीव्र संताप व्यक्त होत आहे. त्यांच्या विधानाबद्दल केवळ माफी नव्हे, तर काँग्रेस पक्षाने त्यांच्यावर तात्काळ कारवाई करून बडतर्फ करावं.

# आर्य कॉन्व्हेंट हायस्कूल व कॉलेजचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

## आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे व आमदार सुलभाताई गायकवाड यांची उपस्थिती

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**




आर्य कॉन्व्हेंट हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, द्वारली, कल्याण या शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन व बक्षीस वितरण समारंभ 'आर्योत्सव 2026' मोठ्या उत्साहात आणि दिमाखात पार पडले. सदर कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे सर, सुदर्शनाताई त्रिगुनाईत, कल्याण पूर्व आमदार सुलभाताई गायकवाड, नगरसेवक महेश गायकवाड , नगरसेविका प्रणाली जोशी, नगरसेविका स्नेहा भाने, मेस्टा अध्यक्ष गजानन पाटील सर, संस्थेचे प्रेरणास्थान सौ. पार्वतीबाई चंदरशेठ म्हात्रे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक अनिल वायले सर, समाजसेवक अविनाश गायकवाड, दीपक पाटील, धनेश म्हात्रे, सुभाष ढोणे, जयरामशेठ गायकवाड, पंडित म्हात्रे, प्रदीप जोशी, अशोक म्हात्रे, हनुमान म्हात्रे, सुरेश म्हात्रे, यज्ञेश पवार, अनिल चिकनकर, भरत चिकनकर, हरिश्चंद्र राणे, प्रमोद पाटील, किशोर जाधव, पत्रकार रघुनाथ सुरळकर, ॲड. उमेश राठोड तसेच पालकवर्ग, विद्यार्थी, माजी विद्यार्थी यांची मोठया संख्येने उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या देशभक्तिपर गीतांनी व आकर्षक सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली. नृत्य, नाटिका, समूहगायन आणि विविध कलागुणांचे सादरीकरण यामुळे संपूर्ण पटांगण टाळ्यांच्या गजरात दुमदुमले. शैक्षणिक, क्रीडा आणि सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा यावेळी मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. गुणवंत विद्यार्थ्यांना पारितोषिके व प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांच्या हस्ते ज्युनिअर कॉलेजच्या नावाचे उद्घाटन करण्यात आले. आपल्या मनोगतात त्यांनी विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी प्रोत्साहन देत शाळेच्या उपक्रमांचे कौतुक केले. येत्या शैक्षणिक वर्षी (2026-27) इयत्ता ११ वी आर्टस्, सायन्स व कॉमर्स शाखेतील सर्व प्रवेश विनामूल्य देण्यात येणार असल्याची माहिती संचालकांनी दिल्याने परिसरातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणाची सुवर्णसंधी उपलब्ध होणार आहे. शाळेचे सर्वेसर्वा ॲड. तुषार म्हात्रे, संचालिका रविता म्हात्रे तसेच ज्युनिअर ट्रस्टी आर्य म्हात्रे यानी शाळेचा प्रवास व भावी वाटचाल यासंबधी पालकांना व पाहुण्यांना संबोधित केले. उप मुख्याध्यापक प्रयाग्या नायर, पर्यवेक्षिका अर्चना नेमाडे , शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे विशेष कौतुक करण्यात आले. तसेच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बैसाखी मोंडल यांनी प्रभाविपणे करून शेवटी शाळेचे शिक्षक संतोष जाधव यांच्या आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# सायकल बँक उपक्रमा अंतर्गत सायकलीचे वाटप

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**



जुन्नर गटशिक्षणाधिकारी अशोक लांडे यांच्या आवाहनानुसार जुन्नरच्या आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना शाळेत ये-जा सुलभ व्हावे या उद्देशाने चाईल्ड फंड इंडिया या संस्थेच्या माध्यमातून अभिजित मदने व अजित सौर यांच्या मार्गदर्शनाखाली "सायकल बँक" उपक्रमाचे नियोजन करण्यात आले आहे.त्या अनुषंगाने भाऊ साहेब बोरा आणे माळशेज विद्यालय मढ येथे तळेरान गावचे सरपंच गोविंद साबळे यांच्या उपस्थितीत सहा गरजू विद्यार्थ्यांना सायकल चे वाटप करण्यात आले यावेळी संस्थेचे समन्वयक विश्वास गालफाडे, शहाजी कसबे,मुख्याध्यापक राणे सर.आहेर सर,शिंदे सर. मोढवे सर चाईल्ड फंड चे सर्व प्रतिनिधी उपस्थित होते चाईल्ड फंड इंडिया ही संस्था जुन्नर परिसरातील आदिवासी व दुर्गम भागांमध्ये विशेषतःलहान मुले व महिलांसाठी आरोग्य, शिक्षण,उपजीविका,बालसंरक्षण तसेच हवामान बदल या विषयांवर कार्यरत आहे संस्थेचे फील्ड स्टाफ नियमितपणे गावांना भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेत असतात. त्या अनुषंगाने प्रकल्पातील काही विद्यार्थ्यांना शाळेत ये-जा करण्यासाठी मोठ्या अंतराचा सामना करावा लागत असल्याचे आढळून आले.यामुळे त्यांच्या उपस्थितीवर व शिक्षणावर प्रतिकूल परिणाम होत होता. ही गरज लक्षात घेऊन विद्यार्थ्यां ना मदत व्हावी, त्यांची शाळेत उपस्थिती वाढावी व शिक्षणा साठी प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने "सायकल बँक" हा उपक्रम राबविण्यात आला आहे. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना शाळेत नियमित येण्यासाठी सायकली देण्यात आल्या आहेत संबंधित विद्यार्थी या सायकली साधारण ३ ते ४ वर्षे वापरतील व त्यानंतर त्या शाळेकडे परत जमा करतील,जेणेकरून इतर विद्यार्थ्यांनाही त्याचा लाभ घेता येईलअसा संस्थेचा मानस आहे. यापुढेही संस्थेमार्फत सुमारे २०० सायकलींचे नियोजन करण्यात येणार असून विविध स्तरातून सहकार्य मिळावे,असे संस्थेने आवाहन केले आहे.

विशेषतःदुर्गम व आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील विद्यार्थ्यांपर्यंत, विशेष करून मुलींपर्यंत शिक्षणाची सुविधा वेळेत पोहोचावी व त्यांना शिक्षणाचा पूर्ण लाभ मिळावा, यासाठी समाजातील सर्व घटकांनी सहकार्य करावे असेही संस्थेने नमूद केले आहे.सदर कार्यक्रमा साठी सायकलींच्या मंजुरीसाठी संस्थेचे सीनियर मॅनेजर अमर कुमार सिंह तसेच महाराष्ट्र राज्याचे सीनियर स्पेशालिस्ट जिनू वर्गीस यांनी विशेष सहकार्य करून परवानगी दिली.



# दिलीपराव मुळे यांचे निधन

**अर्धापुर : (समर्थ गांवकरी)**

अर्धापूर ता १८ नांदेड शहरातील सह्याद्री नगरातील ज्येष्ठ नागरिक दिलीप रामचंद्र मुळे अर्धापूरकर (वय ७३) यांचे बुधवारी (ता १८) दुपारी दिर्ध आजाराने निधन झाले.त्यांची अंत्ययात्रा गुरुवारी (ता १९) सकाळी आठ वाजता राहत्या घरापासून निघून गोवर्धन घाट स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.त्यांच्या मागे पत्नी, तीन भाऊ एक बहीण असा मोठा परिवार आहे.ते सेवा निवृत्त शिक्षक मधुकर मुळे यांचे कनिष्ठ बंधू होत.

# आईच्या डोक्यात धारदार शस्त्राने वार करून हत्या केल्याची थरकाप उडविणारी घटना उघडकीस

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

सावेडी उपनगरातील गुलमोहर रस्त्यावरील नवलेनगर परिसरात मंगळवारी (१७ फेब्रुवारी) दुपारी मुलानेच आईच्या डोक्यात धारदार शस्त्राने वार करून हत्या केल्याची थरकाप उडविणारी घटना उघडकीस आली. विशेष म्हणजे, आईचा खून करून मुलगा मृतदेहाशेजारील बेडवर बसून गोट्या खेळत असल्याचे पोलिसांनी पाहिले. या घटनेमुळे परिसरात भीती आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. बेबी सुधाकर गवारे (वय अंदाजे ६०, मूळ रा. कोपरगाव, सध्या रा. नवलेनगर, गुलमोहर रस्ता, सावेडी, अहिल्यानगर) असे मयत महिलेचे नाव असून, तिचा मुलगा सुहास सुधाकर गवारे (वय अंदाजे ३४) याला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. मंगळवारी दुपारी तोफखाना पोलीस ठाण्याला नवलेनगर येथील एका घरात भांडण सुरू असल्याचा फोन आला. पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. संबंधित घराचा दरवाजा आतून बंद होता. पोलिसांनी खिडकीतून आत डोकावून पाहिले असता, सुहास गवारे हा बेडवर बसून गोट्या खेळत असल्याचे दिसून आले. पोलिसांनी दरवाजा उघडण्यास सांगितले असता त्याने प्रतिसाद देण्याऐवजी खिडकीकडे पोलिसांच्या दिशेने हातात येईल त्या वस्तू फेकून मारल्या तसेच आक्षेपार्ह वक्तव्य केले. परिसरात मोठी गर्दी जमू लागल्याने परिस्थिती तणावपूर्ण बनली. सुहास दरवाजा उघडण्यास तयार नसल्याने पोलिसांनी खिडकीतून त्याच्यावर पाणी फेकून त्याचे लक्ष विचलित केले. त्याचवेळी दुसऱ्या बाजूने दरवाजा तोडून घरात प्रवेश करून त्याला ताब्यात घेतले. घरात प्रवेश केल्यानंतर बेबी गवारे या रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या अवस्थेत आढळून आल्या. त्यांच्या डोक्यावर धारदार शस्त्राने वार केल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. घटनास्थळी नगर शहर पोलीस उपअधीक्षक डॉ. दिलीप टिपरसे, पोलीस निरीक्षक जगदीश भांबळ, उपनिरीक्षक योगेश चाहेर यांनी भेट देऊन पाहणी केली.

फॉरेन्सिक पथकासही पाचारण करण्यात आले होते. मयत महिलेच्या नातेवाईकांच्या फिर्यादीवरून उशिरापर्यंत तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती. पोलिसांनी सुहास गवारे याला ताब्यात घेतले असून पुढील तपास सुरू आहे. या घटनेमुळे नवलेनगर परिसरात एकच खळबळ उडाली असून, कौटुंबिक वादातून ही घटना घडल्याची प्राथमिक चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे.

# नायगावातील १८ ग्रा.पं.कडून घाईघाईत दोन कोटी निधी उचल

**नायगाव : (समर्थ गांवकरी)**

- दोषींवर कारवाई होणार प्रकरण गुलदस्त्यात राहणार?

नायगाव तालुक्यातील प्रशासक नियुक्तीच्या तोंडावर नायगाव तालुक्यातील ग्रामपंचायत कारभारावर संशयाचे सावट निर्माण झाले आहे. तालुक्यातील मुदत संपलेल्या ६८ ग्रामपंचायतींपैकी तब्बल १८ ग्रामपंचायतींनी पंधरावा वित्त आयोगाच्या संयुक्त खात्यातील सुमारे दोन कोटी रुपयांची रक्कम अवघ्या चार ते पाच दिवसांत घाईघाईने काढल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या निधीची अचानक उचल का करण्यात आली, उचललेल्या रकमेतून प्रत्यक्ष विकासकामे झाली का आणि या व्यवहाराला कोणाचे अभय होते का, असे गंभीर प्रश्न आता उपस्थित होत आहेत. ग्रामविकासासाठी पाणीपुरवठा, स्वच्छता, रस्ते, प्रकाशयोजना आदी मूलभूत कामांसाठी पंधरावा वित्त आयोगाचा निधी सरपंच व ग्रामपंचायत अधिकाऱ्यांच्या संयुक्त स्वाक्षरीने चालणाऱ्या खात्यात जमा केला जातो. मात्र वर्षभर निधी न वापरता मुदत संपण्याच्या तोंडावर मोठ्या प्रमाणात रक्कम काढण्यात आल्याने तालुक्यात उलटसुलट चर्चांना उधाण आले आहे. काही ग्रामपंचायतींची खाती पूर्णपणे रिकामी करण्यात आल्याचेही समोर आले आहे. दरम्यान, प्रशासक नेमणुकीच्या पार्श्वभूमीवर पंचायत समितीकडून दि. १३ फेब्रुवारी रोजी सर्व ६८ ग्रामपंचायतींची संबंधित खाती गोठविण्यात आली असून पुढील निधी उचलण्यावर प्रतिबंध घालण्यात आला आहे.

# जल संवर्धनाच्या दिशेने संत निरंकारी मिशनचा सशक्त उपक्रम

## 'प्रोजेक्ट अमृत'चा चौथा टप्पा : घोडनदी, कुकडी, मीना नदी सह होणार ४२ ठिकाणी जल स्वच्छता मोहीम

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**




जेव्हा सेवा हीच साधना ठरते व निसर्गाविषयी संवेदनशीलता जीवनाचा मूलमंत्र बनते,तेव्हा समाजाला नवी दिशा देणारे पवित्र संकल्प जन्माला येतात. मानवसेवा व लोककल्याणाच्या या दिव्य भावनेला साकार रूप देत संत निरंकारी मिशनच्या वतीने 'प्रोजेक्ट अमृत' अंतर्गत 'स्वच्छ जल - स्वच्छ मन' या अभियानाच्या चौथ्या टप्प्याचा भव्य शुभारंभ रविवार,२२ फेब्रुवारी २०२६,सकाळी ८ ते ११ वाजेपर्यंत,परम श्रद्धेय निरंकारी सतगुरु माता सुदीक्षा जी महाराज यांच्या पावन मार्गदर्शनाखाली संपूर्ण भारत भर एकाच वेळी करण्यात येणार आहे.या अभियाना अंतर्गत पुणे जिल्ह्यातील इंद्रायणी,मुळा,मुठा घोडनदी,कुकडी,मिना,भीमा, भामा,पवना,वेळू,कऱ्हा,मांडवी, आनंदी या नद्यांसह शहरातील विविध तलाव अशा ४२ठिकाणी ही मोहीम राबविण्यात येणार आहे.

संत निरंकारी मंडळाचे सचिव आदरणीय जोगिंदर सुखीजा यांनी माहिती देताना सांगितले की,हा विशाल उपक्रम देशभरा तील १५०० हून अधिकठिकाणी एकाच वेळी आयोजित केला जाईल.या महामोहिमेचे हे अभूत पूर्व प्रमाण या मोहिमेला ऐतिहासिक स्वरूप देईल, ज्यामुळे जलसंधारण आणि स्वच्छतेचा संदेश अधिक प्रभावीपणे समाजापर्यंत पोहोचेल. पाणी हे केवळ एक साधन नसून जीवनाचा आधार आणि ईश्वराची अमूल्य देणगी आहे त्याचे संरक्षण करणे हे प्रत्येक नागरिकाचे नैतिककर्तव्य आहे हि जागृती समाजामध्ये निर्माण करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. संत निरंकारी मिशनने बाबा हरदेव सिंह जी यांच्या प्रेरणादायी शिकवणी आत्मसात करून सन २०२३ मध्ये संस्कृती मंत्रालय, भारत सरकार यांच्या सहकार्याने 'प्रोजेक्ट अमृत'ची सुरुवात केली होती.जलसंवर्धन हा उपक्रम केवळ एखाद्या दिवसा पुरता किंवा मर्यादित मोहिमे पुरता न ठेवता,तो एक जीवन शैली, संस्कार आणि सेवाभाव म्हणून स्वीकारण्याची प्रेरणा बनेल — जिथे स्वच्छ जलातून स्वच्छ मन आणि स्वच्छ समाज घडू शकेल.

नद्या, तलाव,सरोवरे,विहिरी व झरे अशा नैसर्गिक जलस्रोतांच्या संरक्षणासाठी समर्पित या जन आंदोलनाने आपल्या पहिल्या तीन टप्प्यांत सेवा,समर्पण व सहभागाचे उत्कृष्ट उदाहरण निर्माण केले आहे.याच यशामुळे प्रेरित होऊन हा चौथा टप्पा अधिक व्यापक, संघटित व दूरदृष्टीपूर्ण स्वरूपात राबविला जात आहे,ज्यामुळे समाजातील प्रत्येक घटकात निसर्गाबद्दल जागरूकता व सहभागाची सशक्त भावना निर्माण होईल.

मधुर समूह गायन, जनजागृती चर्चासत्रे आणि सोशल मीडिया मोहिमेद्वारे जलजन्य आजार व स्वच्छतेचे महत्व अधोरेखित केले जाणार आहे.

जेव्हा मन निर्मळ असते तेव्हाच निसर्ग स्वच्छ राहतो, आणि जेव्हा सेवेत समर्पण असते तेव्हा समाजाचे नवनिर्माण होते हे अभियान त्याच संकल्पनेला बळ देणारे आहे निरंकारी सतगुरु माताजींचा संदेश सदैव हाच राहिला आहे की, आपण ही पृथ्वी पुढील पिढ्यांसाठी अधिक सुंदर, स्वच्छ आणि संतुलित स्वरूपात जपून ठेवली पाहिजे. 'स्वच्छ जल, स्वच्छ मन' हे अभियान त्या पवित्र संकल्पाचे मूर्त स्वरूप आहे, जे समाजाला निसर्ग, समाज व आत्म्याशी जोडून करुणा, समतोल आणि सौहार्दपूर्ण भविष्याच्या दिशेने पुढे नेण्याचे काम करेल.

# डांग दरबार वादाच्या भोवऱ्यात

## नियोजनाच्या नावाखाली अव्यवस्था?

**डांग-गुजरात : (समर्थ गांवकरी)**

आहवा येथे होणाऱ्या ऐतिहासिक आणि आदिवासी परंपरेचे प्रतीक असलेल्या डांग दरबार उत्सवाला आता अवघे काही दिवस शिल्लक असताना प्रशासनाच्या एका निर्णयामुळे स्थानिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.दरवर्षी या उत्सवादरम्यान लाखो पर्यटक आणि स्थानिक आदिवासी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित राहतात. याचा विचार करून मागील वर्षांमध्ये आहवाच्या फुवारा सर्कलपासून डांग स्वराज आश्रमपर्यंतचा मुख्य मार्ग वाहतुकीसाठी खुला ठेवण्याची परंपरा होती. हा मार्ग वघई, आहवा सिव्हिल हॉस्पिटल तसेच सापुतारा, चिंचली आणि नवापूर या महत्त्वाच्या शहरांना जोडणारा प्रमुख दुवा मानला जातो. मात्र यंदा प्रशासनाकडून या महत्त्वाच्या मार्गावरील सुमारे ५० मीटर परिसरात व्यापाऱ्यांना दुकानांसाठी प्लॉट वाटप केल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे स्थानिक नागरिक आणि व्यापाऱ्यांनी तीव्र आक्षेप नोंदवला आहे.नागरिकांचा मुख्य मुद्दा असा आहे की, या धोरणात्मक मार्गावर तात्पुरत्या दुकानांची उभारणी झाल्यास रस्ता अरुंद होईल आणि डांग दरबारसारख्या मोठ्या उत्सवात प्रचंड वाहतूक कोंडी निर्माण होऊ शकते. विशेषतः सिव्हिल हॉस्पिटल या मार्गावर असल्याने आपत्कालीन



सेवा आणि रुग्णवाहिकांची ये-जा अडथळ्यात येण्याची भीती व्यक्त केली जात आहे. जर वाहतूक कोंडीमुळे एखादी गंभीर दुर्घटना घडली, तर त्याची नैतिक जबाबदारी कोण स्वीकारणार? असा सवालही नागरिक उपस्थित करत आहेत.

सामान्यतः अशा मोठ्या सांस्कृतिक कार्यक्रमांत सुरक्षा आणि सार्वजनिक सुविधा यांना प्राधान्य दिले जाते. मात्र येथे प्लॉट वाटपाला जास्त महत्त्व दिले जात असल्याचे चित्र दिसत आहे, अशी टीका होत आहे.

आहवा आणि परिसरातील जागरूक नागरिकांनी प्रशासनाला पत्र देऊन तसेच सोशल मीडियाच्या माध्यमातून या निर्णयाचा तात्काळ पुनर्विचार करण्याची मागणी केली आहे. डांग दरबारची परंपरा आणि प्रतिष्ठा अबाधित राहावी, पर्यटकांना कोणतीही गैरसोय होऊ नये यासाठी पर्यायी पार्किंग व्यवस्था आणि सक्षम वाहतूक नियोजन करावे, अशी मागणी होत आहे.

आता पुढील काही दिवसांत जिल्हा प्रशासन लोकभावना लक्षात घेऊन निर्णयात बदल करणार का, की वाहतूक गोंधळाच्या सावटाखालीच यंदाचा डांग दरबार पार पडणार, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## आर जी देशमुख कृषी विद्यालय : विद्यार्थ्यांना निरोप

**श्रीरामपूर : (समर्थ गांवकरी)**

अमरावती जिल्ह्याच्या वरुड तालुक्यातील "वाठोडा चांदस" येथील आर.जी देशमुख कृषी विद्यालयातील दहावीच्या विद्यार्थ्यांना नुकताच निरोप देण्यात आला. वर्ग दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित निरोप समारंभ कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य अजय देशपांडे होते तर दै.चुडामणी दर्शन चे संपादक व वरुड नगरपालिका स्वीकृत सदस्य प्रवीणभाऊ सावरकर तसेच प्रा. सुधाकर गावंडे सर व पालक प्रतिनिधी किशोर दळवी बेसखेडा तसेच पर्यवेक्षक एस.एन. राऊत प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. ग्रामदैवत यशवंत माऊली यांच्या प्रतिमेच्या पूजनाने सुरुवात झालेल्या या कार्यक्रमाचे आयोजक व्ही. एम. बागडे सर यांनी प्रास्ताविक केले. त्यानंतर आरुषी मोरले, आरुषी भुसारी, रसिका गोहत्रे, ध्रुव वीरखरे, दीक्षा देशमुख, गुरुक्षा कावलकर




या विद्यार्थ्यांनी याप्रसंगी आपले मनोगत व्यक्त केले. प्रा. सुधाकर गावंडे व पत्रकार प्रवीण सावरकर यांचा शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. वर्ग दहावीचे वर्ग शिक्षक पी. के. भुजाडे सरांनी व मान्यवरांनी आपल्या मनोगतामध्ये दहावीच्या विद्यार्थ्यांना परीक्षेविषयी मार्गदर्शन केले. "सक्षम" उपक्रमांतर्गत आयोजित जिल्हास्तरीय प्रदर्शनी मध्ये विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतल्याबद्दल विद्यार्थ्यांचा व त्यांच्या मार्गदर्शक शिक्षिका कु.के एस. देशमुख मॅडम यांचा मान्यवरांच्या शुभहस्ते प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. तसेच संस्थेचे संस्थापक कै. रामराव गणपतराव देशमुख यांच्या पुण्यतिथी निमित्त आयोजित स्पर्धा परीक्षेमध्ये प्राविण्य प्राप्त विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला. या निरोप समारंभ कार्यक्रमाचे सुंदर संचालन कु.जान्हवी गावंडे, कु.गुंजन डांगे यांनी तर ईश्वरी घोरमाडे व खुशी सदारंग या विद्यार्थिनींनी उपस्थित मान्यवरांचे आभार मानले. वंदे मातरम या राष्ट्रीय गीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

## अवघ्या १५ दिवसांत ६०० पानी आरोपपत्र न्यायालयात दाखल

**डांग : (समर्थ गांवकरी)**

■ हत्या प्रकरणात वघई पोलिसांची धडाकेबाज कामगिरी

डांग जिल्ह्यातील बोरिगांवठा गावात झालेल्या वनकर्मचारीच्या निर्घृण हत्येप्रकरणी वघई पोलिसांनी उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिस प्रशासनाने केवळ १५ दिवसांत तपास पूर्ण करत ६०० पानी आरोपपत्र न्यायालयात सादर केले असून आरोपींना कठोर शिक्षा व्हावी यासाठी महत्त्वाचे पाऊल उचलले आहे.मृत वनकर्मचारी सनतभाई गनसुभाई बिरारी (वय ५३) हे वन खात्यात कायम रोजंदार म्हणून बारखांध्या येथे कार्यरत होते. दि. ३१ जानेवारी २०२६ रोजी ते कर्तव्यावरून परतत असताना मध्यरात्री सुमारास बोरिगांवठा गावाजवळ तीन जण सायकलवर चोरीचे लाकूड घेऊन जात असल्याचे त्यांनी पाहिले. त्यांनी त्यांना अडविण्याचा प्रयत्न केला असता संतप्त झालेल्या चोरट्यांनी बांबूच्या काठ्यांनी त्यांच्या डोक्यावर आणि कपाळावर जीवघेणा हल्ला करून त्यांची हत्या केली आणि अंधाराचा फायदा घेत पळ काढला.या घटनेप्रकरणी वनरक्षक हरेशकुमार चौधरी यांनी तक्रार दाखल केल्यानंतर डांग पोलीस यांनी तात्काळ तपासाला गती दिली. सुरत विभागाचे आयजी प्रेमवीरसिंह आणि जिल्हा पोलिस अधीक्षक पूजा यादव यांच्या मार्गदर्शनाखाली तांत्रिक सर्व्हेलन्स आणि गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी दुसऱ्याच दिवशी आरोपींची ओळख पटवली. जंगलात कॉम्बिंग ऑपरेशन राबवून तिघा आरोपींना अटक करण्यात आली.

आरोपींना कठोर शिक्षा व्हावी यासाठी पोलिस अधीक्षक पूजा यादव यांच्या अध्यक्षतेखाली विशेष पथकाची स्थापना करण्यात आली. उपविभागीय पोलिस अधिकारी के.आर. डिमरी, पोलीस निरीक्षक व्ही.के. गढवी आदी अधिकाऱ्यांचा समावेश असलेल्या या पथकाने दिवस-रात्र परिश्रम घेत वैज्ञानिक पद्धतीने पुरावे संकलित केले. अवघ्या १५ दिवसांच्या कालावधीत ६०० पानी आरोपपत्र न्यायालयात दाखल करून न्यायप्रक्रियेला गती देण्याचे उल्लेखनीय कार्य वघई पोलिसांनी करून दाखवले आहे.

## ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयात आज प्रदर्शन

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

सांस्कृतिक कार्य विभाग व सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य आणि जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने १९ फेब्रुवारी २०२६ रोजी 'शिवजयंती' निमित्त विविध भव्य कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्याचे मुख्य आकर्षण म्हणजे 'शिवकालीन वस्तूंचे प्रदर्शन' असून, याद्वारे नागरिकांना छत्रपती शिवाजी महाराज यांच्या काळातील ऐतिहासिक वारसा जवळून अनुभवता येणार आहे. अश्वमेध प्रतिष्ठान आणि 'इंटॅक' (INTACH) ठाणे चॅप्टर यांच्या विशेष सौजन्याने हे प्रदर्शन जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, ठाणे येथे भरवण्यात येणार आहे.

## अध्यात्मिक उन्नतीसाठी महाशिवरात्री व्रत महत्त्वाचे – डॉ. रवींद्र भोळे

### वाघापूर येथील श्री माणकेश्वर मंदिरात अखंड हरिनाम सप्ताह व प्रवचन सोहळा संपन्न

**पुरंदर (वाघापूर): (समर्थ गांवकरी)**

महाशिवरात्री हा दिवस साधकांसाठी स्फूर्तीदायक असून अध्यात्मिक उन्नतीसाठी या व्रताचे विशेष महत्त्व आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ समाजसेवक व प्रवचनकार ह.भ.प. डॉ. रवींद्र भोळे यांनी केले. वाघापूर येथील श्री माणकेश्वर मंदिरात आयोजित महाशिवरात्री अखंड हरिनाम सप्ताह व शिवलीलामृत पारायण सोहळ्यात ते बोलत होते. डॉ. भोळे म्हणाले, महाशिवरात्रीच्या दिवशी नवीन चेतना निर्माण होते. संसारातील दुःखरूपी विष सहन करून सकारात्मकतेने पुढे जाण्याची प्रेरणा या पर्वातून मिळते. नवोदित वधू-वरांसाठीही हा दिवस जीवनातील तडजोडी व समन्वय शिकवणारा ठरतो. योग्य साधकांना या दिवशी योगसामर्थ्य प्राप्त होते.



सह्याद्रीच्या कुशीतील नैसर्गिक अरण्यात वसलेले वाघापूर येथील श्री माणकेश्वर मंदिर अत्यंत प्राचीन व जागृत देवस्थान असल्याचेही त्यांनी नमूद केले. नवनाथांपैकी अडबंगनाथ यांच्या पदस्पर्शाने ही भूमी पावन झाल्याची श्रद्धा असून येथे केलेली साधना फलदायी ठरते, असे त्यांनी सांगितले. यावेळी माजी पोलीस अधिकारी कृष्णाजी इंदलकर, अर्जुन भाऊ फौजी, ह.भ.प. बापूसो गायकवाड महाराज, देवेंद्र पांडुरंग कुंजीर, विजय तुकाराम कुंजीर, वसंत गुरुजी, रोहिदास कुंजीर, रामदास आप्पा, कैलास तात्या, बाजीराव नाना कुंजीर, अरुण तात्या, रामचंद्र कुंजीर, अशोक कुंजीर, गौतम दादा कुंजीर, मच्छिंद्र कुंजीर, दादा कुंजीर, बापू कुंजीर, योगेश कड, रवानाना कुंजीर, माऊली इंदुलकर, संतोष कुंजीर, नारायण देव तसेच वाघापूरच्या सरपंच सौ. दिपाली कुंजीर, सौ. सविता कुंजीर, सौ. दीक्षित बाई, सौ. विजयंता इंदलकर, सौ. सुमनताई वाईकर आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान सुप्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प. अनंता महाराज परदेशी, ह.भ.प. सतीश महाराज खोमणे, ह.भ.प. झाडे महाराज, ह.भ.प. शिवाजी महाराज पवार, ह.भ.प. श्रीपाद महाराज जाधव तसेच वारकरी भूषण ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज तांबे यांची सुश्राव्य कीर्तने झाली. तसेच दिव्यानंदगिरी मौनगिरी महाराज यांनी शिवपुराणावर आधारित प्रवचन केले.

श्री माणकेश्वर महाशिवरात्री अखंड हरिनाम सप्ताहाचे हे सतरावे वर्ष असून समस्त ग्रामस्थ व मंदिर समितीच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. महाशिवरात्रीच्या पावन पर्वावर मोठ्या भक्तिभावाने धार्मिक सोहळा संपन्न झाला.

## उपसरपंच अमोल दाभाडे यांचे आमरण उपोषण तात्पुरते स्थगित

**आंबेगाव : (समर्थ गांवकरी)**

आंबेगाव तालुक्यातील चांडोली खुर्द गावातील गायरान जमिनीवर प्रस्तावित मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी प्रकल्पाच्या संदर्भात ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली होती. संबंधित सौर प्रकल्पासाठी सुमारे १२.८ हेक्टर गायरान जमीन संपादन करण्यात आली होती. ग्रामसभेने केवळ २.०० हेक्टर जमीन देण्याचा ठराव मंजूर केलेला असताना उर्वरित संपूर्ण जमीन देण्याचा निर्णय घेण्यात आल्यामुळे ग्रामस्थांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे. ग्रामस्थांच्या मते, उर्वरित जमीन ही भविष्यातील गावठाण विस्तार, भूमिहीन कुटुंबांना घरकुल, स्मशानभूमी, शैक्षणिक व आरोग्य सुविधा तसेच इतर मूलभूत गरजांसाठी अत्यावश्यक आहे.

दरम्यान, संबंधित सौर प्रकल्पासाठी काम करणाऱ्या आवादा कंपनीने ग्रामस्थांना विश्वासात न घेता व त्यांच्या भावनांचा विचार न करता जबरदस्तीने काम सुरू केल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. गायरान जागेत पन्नास वर्षांपेक्षा अधिक काळ राहणाऱ्या पारधी समाजाच्या झोपड्या तोडण्यात आल्या होत्या तसेच कंपनीच्या काही प्रतिनिधींनी स्थानिक ग्रामस्थांना वारंवार




धमक्या दिल्याच्या तक्रारीही करण्यात आल्या आहेत. यामुळे गावात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते.

या पार्श्वभूमीवर ग्रामस्थांच्या न्याय्य मागण्यांसाठी चांडोली खुर्द गावचे उपसरपंच श्री.अमोल दाभाडे यांनी आमरण उपोषण सुरू केले होते. या आंदोलनाची दखल घेत आंबेगाव तालुक्यातील सर्व पक्षांचे प्रमुख नेते आंदोलन स्थळी दिवसभर उपस्थित होते. उपविभागीय अधिकारी श्री. गोविंद जाधव यांच्याशी दूरध्वनीद्वारे संवाद साधल्यानंतर आंबेगावचे तहसीलदार डॉ.सचिन वाघ चांडोली खुर्द येथे दाखल झाले. आंदोलकांचा आक्रमक पवित्रा, गावची भविष्यातील गरज, ठेकेदाराची मुजोरी या सर्व मुद्द्यांवर सविस्तर चर्चा झाली व ग्रामस्थांच्या मागण्यांचा सकारात्मक विचार करण्यात येईल, असे प्रशासनाकडून सांगण्यात आले. संबंधित ठेकेदार व ऊर्जा विभागाला पुढील आदेश येईपर्यंत काम थांबविण्याच्या सूचना देण्यात आल्या.

यानंतर तहसीलदार यांनी लेखी आश्वासन देऊन संबंधित सर्व प्रश्न सोडविण्यासाठी योग्य ती कार्यवाही करण्यात येईल, तसेच जिल्हाधिकारी, प्रांत व स्थानिक ग्रामस्थ यांच्या उपस्थितीत वरिष्ठ स्तरावर बैठक घेऊन तोडगा काढण्यात येईल, असे स्पष्ट केले. प्रशासनाच्या या लेखी आश्वासनानंतर व ग्रामस्थांच्या हिताचा विचार होईल या विश्वासातून उपसरपंच श्री. अमोल दाभाडे यांनी ग्रामस्थांच्या उपस्थितीत आमरण उपोषण स्थगित केले आहे. ग्रामस्थांनी स्पष्ट केले आहे की, न्याय्य मागण्या पूर्ण न झाल्यास पुढील काळात तीव्र आंदोलन छेडण्यात येईल.

भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याचे मा.अध्यक्ष देवदत्त निकम, शिवसेना जिल्हाप्रमुख देविदास दरेकर, युवासेना कार्यकारिणी सदस्य सचिन बांगर, जिल्हा परिषद सदस्य विष्णुकाका हिंगे, पंचायत समिती सदस्य शिवाजीराव निघोट, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष विजयराव पवार, डॉ.ताराचंद कराळे, शिवसेना तालुकाप्रमुख प्रविण थोरात पाटील, उद्योजक संजयशेठ थोरात, चांडोली खुर्द गावच्या सरपंच प्रियांका भागीत, मा.सरपंच बी.टी.बांगर, निरगुडसरचे सरपंच रविंद्र वळसे पाटील, शिवसेना नेते मनोहर इंदोरे, महेंद्र बांगर यांच्यासह मोठ्या संख्येने चांडोली खुर्द गावातील ग्रामस्थ उपस्थित होते.

## ग्रामसेवक मुख्यालय नियम पूर्णपणे धाब्यावर

**इगतपुरी : (समर्थ गांवकरी)**

ग्रामीण भागातील प्रशासन सुरळीत चालावे, नागरिकांना वेळेवर सेवा मिळावी आणि शासकीय योजना प्रभावीपणे राबवता याव्यात, यासाठी शासनाने ग्रामसेवकांना आपल्या नियुक्त ग्रामपंचायत मुख्यालयात वास्तव्यास राहणे बंधनकारक केले आहे. यासाठी शासनाकडून ग्रामसेवकांना मुख्यालयात राहण्याचा भत्ता, निवास सुविधा व इतर सवलती दिल्या जातात. मात्र प्रत्यक्षात इगतपुरी तालुक्यात हे सर्व नियम केवळ कागदावरच उरले असल्याचे चित्र स्पष्टपणे दिसून येत आहे. इगतपुरी तालुक्यात अनेक ग्रामसेवक मुख्यालयात वास्तव्यास राहत नसून, ग्रामपंचायतीचे दैनंदिन कामकाज अक्षरशः रामभरोसे सुरू आहे. ग्रामस्थांना दाखले, जन्म–मृत्यू नोंदणी, घरकुल योजना, रोजगार हमी, पाणीपुरवठा, स्वच्छता, कर वसुली यांसारख्या अत्यावश्यक कामांसाठी वारंवार ग्रामपंचायत कार्यालयाचे फेरे मारावे लागत आहेत.

## दादर येथे बेस्ट वर्कर्स युनियनचा भव्य मेळावा

■ २५ मार्चला चक्काजाम आंदोलनाचा इशारा!

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

बेस्ट वर्कर्स युनियन आणि संघर्ष कामगार कर्मचारी युनियन यांच्या संयुक्त विद्यमाने दादर येथे भव्य कामगार मेळावा उत्साहात संपन्न झाला. बेस्ट उपक्रमातील असंख्य कर्मचारी व सेवानिवृत्त कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मेळाव्यात कामगारांच्या प्रलंबित मागण्यांबाबत तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली. मागील तीन महिन्यांपूर्वी बेस्ट प्रशासनासमोर विविध मागण्या मांडण्यात आल्या होत्या; मात्र अद्यापही त्यावर ठोस तोडगा निघालेला नाही. यासंदर्भात 24 मार्च ही अंतिम मुदत देण्यात आली असून, त्या पर्यंत सकारात्मक निर्णय न झाल्यास 25 मार्च रोजी मुंबईत चक्काजाम आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला. कामगार नेते श्री शशांकराव साहेब (सरचिटणीस, बेस्ट वर्कर्स युनियन) यांनी कामगारांना संबोधित करताना सांगितले की,




"कामगारांच्या न्याय्य मागण्या मान्य झाल्या नाहीत तर 25 मार्चला तीव्र आंदोलन छेडले जाईल."

प्रमुख मागण्या पुढीलप्रमाणे :

बेस्ट कर्मचाऱ्यांचा प्रलंबित वेतन करार तात्काळ लागू करणे.

पदोन्नतीसाठी रिक्त जागा त्वरित भरणे.

सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची ग्रॅज्युटी तात्काळ देणे.

खाजगी कंत्राटी कर्मचाऱ्यांना समान कामाला समान वेतन.

बेस्टच्या मालकीच्या 3337 बस ताफ्याचे संरक्षण व संवर्धन.

बेस्टचे मुंबई महानगरपालिकेमध्ये विलीनीकरण.

हंगामी कर्मचाऱ्यांना कायमस्वरूपी सेवेत समाविष्ट करणे.

यावेळी कायदेशीर सल्लागार श्री राजाराम यादव, उपाध्यक्ष श्री शेलार साहेब, श्री अतुल दुर्गाडे, श्री शिंदे, श्री बाबा इनामदार, श्री नायर साहेब, श्री नितीन गोरे, आगार प्रतिनिधी श्री समीर शेख, श्री सुरेश लोहकरे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. मेळाव्यातील वक्त्यांनी कामगारांच्या एकजुटीवर भर देत प्रशासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अन्यथा 25 मार्च रोजी मुंबईत मोठ्या प्रमाणावर आंदोलन उभारण्यात येईल, असा ठाम इशारा दिला.

## इगतपुरीत कोट्यवधींच्या रिसॉर्ट जमिनीवर डोळा

**इगतपुरी : (समर्थ गांवकरी)**

इगतपुरी तालुक्यातील तळेगाव येथील कोट्यवधी रुपये किमतीच्या रिसॉर्ट प्रकल्पाच्या जमिनीवर बेकायदेशीर कब्जा करण्याचा प्रयत्न, बनावट कागदपत्रांची निर्मिती आणि धमकावणे या गंभीर आरोपांप्रकरणी पोलिसांनी तीन जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. फिर्यादी पूजा संजीव कळमबेकर यांनी इंगतपुरी पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीवरून नाशिक ग्रामीण आर्थिक गुन्हे शाखा आणि इगतपुरी पोलीस ठाणे यांनी संयुक्त कारवाई करत तपास सुरू केला आहे. या प्रकरणात मिलिंद रामभाऊ कांबळे, संदीप जगताप आणि धीरज निकम यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यांच्यावर बनावटगिरी, फसवणूक, धमकी देणे आणि गुन्हेगारी कट रचल्याचे आरोप आहेत.

**अगस्ति सहकारी साखर कारखाना लि. अगस्तिनगर**

**ता. अकोले, जि. अहमदनगर,** फोन नं. (०२४२४) २९७१२६

**ग्राम–अगस्तिसाखर,** Email id - agastisakhar@rediffmail.com

**–: बेल्ड बगॅस / लुज बगॅस विक्री टेंडर :–**

आमचे कारखान्याचे गळीत हंगाम २०२५–२६ मधील ऊत्पादित शिल्लक बेल्ड बगॅस (यार्डातील थप्पीवरील) अंदाजे ३०० मे.टन व लुज बगॅस १५०० मे.टन विक्री करावयाचे आहे. तरी अधिकृत परवानाधारक व इच्छुक खरेदीदारांनी दराबाबतच्या आपआपल्या सिलबंद निविदा संपर्क नंबरसह सोमवार दि. २३/०२/२०२६ रोजी सायं. ५.०० वाजे पर्यंत कारखाना कार्यस्थळावर पोहचतील अशा बेताने समक्ष अथवा ई–मेलवर पाठवाव्यात. निविदेसोबत रु. २५,०००/– रोख अथवा डी.डी. ने डिपॉझीट कारखान्याकडे जमा करावे लागेल. डिपॉझीट कारखान्याकडे जमा न करता आलेल्या टेंडरचा विचार केला जाणार नाही. दरा बाबत प्रत्यक्ष चर्चेसाठी नंतर कळविणत येईलू, टेंडर मंजुर अथवा नामंजुर करण्याचा अधिकार कारखाना व्यवस्थापनाने राखून ठेवलेला आहे.

(सुधिर कापडणीस) कार्यकारी संचालक
(श्रीमती सुनिताताई भांगरे) व्हा. चेअरमन
(सिताराम पाटील गायकर) चेअरमन

**जाहीर नोटीस**

**टायटल व्हेरिफिकेशन कामी जाहीर नोटीस**

तमाम लोकांस कळविण्यात येते कि, तुकडी जिल्हा नाशिक पोट तुकडी तालुका इगतपुरी पैकी मौजे कुरुंगवाडी या गावाचे शिवारातील शेतजमीन मिळकत यांसी १) गट नं. ४३ यांसी क्षेत्र हे ९–९१–६० आर + पोखर हे १–५१–०० आर यांसी एकुण क्षेत्र हे ११–४२–६० आकार रू.६–९१ पैसे २) गट नं.४१ यांसी क्षेत्र हे १–४२–०० आर पोख हे ०–१६–०० आर यांसी एकुण क्षेत्र हे १–५८–०० आकार रू.१–०८ पैस या मिळकती.

सदर मिळकती या श्री. रामनाथ बाबुराव सोनवणे यांच्या मालकीच्या व प्रत्यक्ष कब्जेवहीवाटीतील आहे. त्यांनी सदर मिळकती निर्वेध व बिनबोजाच्या आहे असे सांगुन सदर मिळकतीचे टायटलचे काम आमच्याकडे सोपविलेले आहे. तरी सदर नमुद मिळकतीचे निर्वेधतेबाबत खात्री करावयाची असल्याने प्रस्तुतची जाहीर नोटीस प्रसिध्द केलेली आहे. सबब, सदर मिळकतीबाबत कोणाही त्रयस्त व्यक्ती अगर संस्था यांचा काही बोजा अगर चार्ज जसे गहाण, दान, लिन, लिज, अन्न वस्त्र, खावटी, विसार पावती, साठेखत, खरेदीखत, अन्य कोणत्याही प्रकारे हरकत असल्यास त्यांनी आपली लेखी हरकत पुराव्याचे सांक्षाकीत कागदपत्रासह आमच्या खालील कार्यालयात प्रस्तुत ची नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १० (दहा) दिवसांचे आत नोंदवावी. मुदती नंतर व कोणत्याही पुराव्याशिवाय हरकत नोंदविल्यास अगर परस्पर वर्तमान पत्रात हरकत प्रसिध्द केल्यास ती हरकत आमचे पक्षकारांवर व सदर मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही. व त्यानंतर सदर मिळकत निर्वेध व बिन बोज्याची आहे. असे समजुन आमचे पक्षकार वर नमुद मिळकती बाबत व्यवहार करण्यास पात्र राहातील.

कळावे ही जाहीर नोटीस

आमचे मार्फत प्रसिध्द ॲड. किर्ती भगवान गायकर
पत्ता. इगतपुरी बार रुम, इगतपुरी कोर्ट, ता. इगतपुरी जि. नाशिक
ता. /०२/२०२६ मो. नं.९२८४०३६८६१

**जाहीर नोटीस**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अकोले यांचे कार्यालय ता. अकोले, जि. अहमदनगर यांचे न्यायालयात...**

१. यादव विश्वनाथ कोटकर, रा. कुंभेफळ, ता.अकोले, जि. अ.नगर..**अर्जदार**

**विरुध्द.....** १. चांगुनाबाई नाना कोटकर, २. मैनाबाई नाना कोटकर, ३. तुळसाबाई नाना कोटकर, सर्व रा. कुंभेफळ, ता. अकोले, जि. अ.नगर ...**सामनेवाले**

या नोटीसीद्वारे कळविणेत येते की, यादव विश्वनाथ कोटकर, रा.कुंभेफळ, ता.अकोले यांनी मौजे कुंभेफळ ता.अकोले येथील स.नं. २४/१, २४/४, ४६/१, ४६/२, ४६/३, ५३१, ५८/३८ या ७/१२ मधील इतर हक्कात दाखल असलेली नावे **(मैनाबाई नाना कोटकर, चांगुणाबाई नाना कोटकर, तुळसाबाई नाना कोटकर)** पोकळीस्त म्हणुन कमी होणेबाबत दिनांक ३०/१०/२०२५ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

सदर अर्जाबाबत दिनांक ०४/०३/२०२६ रोजी तहसिल कार्यालय अकोले येथे सकाळी ११.०० वाजता सुनावणी ठेवणेत आलेली आहे. तरी पोकळीस्त म्हणुन इतर हक्कातील नावे असलेल्या व्यक्तींचे कोणी वारस असल्यास सदर वारसांनी अथवा कोणाचे काही म्हणणे असल्यास कागदपत्रासह सदर दिनांकास उपस्थित रहावे. सदर दिनांकास आपण उपस्थित न राहिल्यास याबाबत कुणाचेही काहीएक म्हणणे नाही असे समजणेत येऊन गुणवत्तेवर निर्णय देणेत येईल. तसेच सदर प्रकरणात पुढील तारखेबाबत रोजनाम्यात नमुद करणेत येईल. याबाबत पुन्हा कोणताही पत्रव्यवहार करणेत येणार नाही याची नोंद घ्यावी.

आज दि. १७/०२/२०२६ रोजी सही व शिक्क्यानिशी दिले असे.

हुकूमावरुन,
आरटीएस केस क्र. ०५/२०२६ तहसिलदार तथा
अकोले, दि. १७/२/२०२६ कार्यकारी दंडाधिकारी, अकोले

# दरोडा टाकून डिझेल चोरणारी टोळी गजाआड!

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**



दरोडा टाकून डिझेल चोरी करणारी टोळी मिरजगाव पोलिसांनी जेरबंद केली. या कारवाईत १५ लाख १५ हजार रूपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे, उपविभागीय पोलिस अधिकारी प्रविणचंद्र लोखंडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक विजय झंजाड, सुनील माळशिखरे, विकास चंदन, गणेश ठोंबरे, सुनील खैरे, गोकुळ पळसे, राजेंद्र गाडे, बळीराम काकडे, अशोक रक्ताटे, नितीन शिंदे, राहुल गुंडू यांच्या पथकाने ही कारवाई केली. पोहेकॉ अशोक रक्ताटे, पोकॉ राजेंद्र गाडे हे पेट्रोलिंग करीत असताना एक स्वीफ्ट कार व स्कॉर्पिओ भरधाव वेगात जाताना दिसली. रक्ताटे व गाडे यांनी या दोन्ही वाहनांचा पाठलाग केला. स्विफ्ट कार तिखी शिवारात मिरजगाव ते कडा रस्त्यावर एका पोलला धडकली. कारमधील 3 जण कार सोडून पळून गेले. स्कॉर्पिओचा पाठलाग केला असता स्कॉर्पिओ आष्टीच्या (जि. बीड) दिशेने पळून गेली. स्वीफ्ट कारमध्ये डिझेल चोरीचे साहित्य, ड्रम, पाईप व ३ कोयते मिळून आले. गाडी सोडून पसार झालेल्या आरोपींचा पोलिसांनी शोध घेतला. भगवान गोवर्धन पठारे (वय- ४० रा. सालेवडगाव, ता. आष्टी, जि. बीड), सुनील प्रमोद श्रीवास्तव (वय- ४९, रा. खाडवानाका, तेजाजीनगर, इंदूर), गणेश नवनाथ दहातोंडे (वय- २०, सालेवडगाव, ता. आष्टी), आकाश दत्तू मोरे (वय- ३४, रा. नांदगाव, जि. नाशिक, हल्ली रा. निमगाव चोभा, ता. आष्टी) यांना अटक केली. या कारवाईत एक स्कॉर्पिओ (एमएच 15 जीआर 2882), एक स्वीफ्ट कार( एमएच 14 सीसी 6977), तीन मोबाईल, ७ ड्रम, डिझेल काढण्यासाठी लागणारे दोन पाईप, ३ कोयते, दोन मिरची पुड्या, एक दोरी असा एकूण १५ लाख १५ हजाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपींनी मिरजगाव, कर्जत, जामखेड परिसरात डिझेल चोरीचे १८ ठिकाणी गुन्हे केल्याची कबुली दिली.



ठाणे : दिवा रेल्वे स्थानकापुढील कोकण रेल्वे मार्गावरील पहिले असलेले दातीवली रेल्वे स्टेशनचे नाव रेल्वे प्रशासनाकडून दातिवली रेल्वे स्थानकाच्या फलकावर नव्याने आगासान असे असे नाव लिहिण्यात आले होते. परंतू स्थानिक दातिवली ग्रामस्थांच्या जागरूकतेमुळे आणि दबावामुळे रेल्वे प्रशासनाने आगासान हे लिहिलेले नाव तातडीने बुजवण्यात आले आहे. त्यामुळे नजीकच्या काळात दातीवली स्थानकाचे नामांतर आगासान असे होण्याची शक्यता रेल्वे प्रशासनाकडून होत असल्याचे चित्र निर्माण झाले आहे. ( फोटो - संतोष पडवळ )

## थोडक्यात बातम्या...

### ‘त्या’ सिमेंट प्रकल्पाची चौकशी; 'खा. लंके यांचे आक्षेप'



अहिल्यानगर (स. गांवकरी) : जिल्ह्यातील श्रीगोंदा तालुक्यातील निमगाव खलू येथे प्रस्तावित ६.० एमटीपीए क्षमतेच्या सिमेंट ग्राइंडिंग प्रकल्पावरून वाद अधिकच तापला असून आता प्रकरण थेट केंद्र-राज्य प्रशासनाच्या उच्च पातळीवर पोहोचले आहे. स्थानिक नागरिक व शेतकऱ्यांनी केलेल्या आक्षेपांनंतर खासदार नीलेश लंके यांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांची गंभीर दखल घेत अधिकृत चौकशी प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. केंद्रीय पर्यावरण मंत्री भूपेन्द्र यादव यांनी मंत्रालयीन स्तरावर आढावा घेतल्यानंतर प्रकरण राज्य यंत्रणांकडे तपासासाठी पाठवले. संबंधित प्रकल्प ‘कॅटेगरी-बी’मध्ये येत असल्याने पर्यावरण मंजुरी राज्य स्तरावर होत असली, तरी पर्यावरणीय, सामाजिक आणि आरोग्यविषयक मुद्द्यांचा सखोल विचार करूनच पुढील निर्णय घ्यावा, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. केंद्रीय स्तरावर उद्योग विभागामार्फत राज्य शासनाला पत्र पाठवून उपस्थित मुद्द्यांवर तपास करून ‘ॲक्शन टेकन रिपोर्ट’ सादर करण्यास सांगण्यात आले. त्यानंतर प्रकरण पुढे जात राज्यस्तरावर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि एस इ आय ए ए महाराष्ट्र यांना तपासाचे आदेश देण्यात आले. फेब्रुवारी २०२६ मध्ये राज्य पर्यावरण विभागाने जिल्हाधिकारी अहिल्यानगर तसेच प्रदूषण नियंत्रण मंडळाला सखोल चौकशी करून तातडीने अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. ही कारवाई २ डिसेंबर २०२५ रोजी नीलेश लंके यांनी उपस्थित केलेल्या तक्रारीतील मुद्द्यांच्या आधारे करण्यात आल्याचे अधिकृत पत्रात नमूद आहे. या प्रकल्पाविरोधात सुमारे पाच हजारांहून अधिक आक्षेप नोंदवले गेले आहेत. नागरिकांनी ईआयए अहवालातील त्रुटी, लोकसुनावणीतील पारदर्शकतेचा अभाव, हवा-पाणी प्रदूषणाचा धोका, शेती-पशुपालनावर परिणाम आणि आरोग्यविषयक दुष्परिणाम यांसह जमीन नोंदी व आपत्ती व्यवस्थापन आराखड्यातील त्रुटींचे मुद्दे मांडले आहेत. या सर्व घडामोडींमुळे निमगाव खलू प्रकल्प आता केवळ स्थानिक न राहता प्रशासकीय आणि धोरणात्मक पातळीवरील विषय ठरला आहे. केंद्राचे निर्देश, राज्याची चौकशी आणि पर्यावरण मंजुरी प्रक्रियेत होणारा निर्णय या प्रकरणात निर्णायक ठरणार असून ग्रामस्थांचे लक्ष आगामी अहवालाकडे लागले आहे. दरम्यान, ग्रामस्थ व सामाजिक संघटनांकडून प्रश्न मांडल्याबद्दल खासदार नीलेश लंके यांचे आभार व्यक्त केले जात आहेत.



मराठी पत्रकार संघाच्या अर्धापुर तालुकाध्यक्षपदी सखाराम क्षीरसागर, उपाध्यक्षपदी गंगाधर सोनटक्के यांची निवड झाल्याबद्दल शिवसेना उबाठाचे नांदेड जिल्हाप्रमुख बबनराव बारसे यांनी सत्कार करून शुभेच्छा दिल्या यावेळी उपसरपंच बालाजी गोदरे,दत्ता पाटील पारवे,शिवा संघटनेचे तालुकाध्यक्ष ओमप्रकाश नागलमे आदी सह धनमुद्रा अर्बन बँकेचे कर्मचारी उपस्थित होते.

## सकल माळी समाजाच्या मध्यस्थीने कोके यांचे उपोषण स्थगित

### मागण्या मान्य न झाल्यास पुन्हा आंदोलनाचा इशारा




**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

माळीवाडा पंचमंडळ देवस्थान ट्रस्टच्या संदर्भातील मागण्यांसाठी कोके परिवाराच्या वतीने धर्मदाय आयुक्त कार्यालयासमोर उपोषण सुरू केले होते.यावेळी सकल माळी समाजाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांनी उपोषण स्थळी जाऊन त्यांची भेट घेतली व उपोषणा संदर्भात माहिती घेतली होती. गेल्या दोन दिवसांपासून उपोषणास बसलेले उपोषणकर्ते प्रसाद कोके यांनी आपल्या मागण्यांबाबत ठाम भूमिका घेतली होती.ट्रस्टच्या कारभारासंदर्भात काही मुद्द्यांवर त्यांनी हरकती नोंदवत न्याय मिळावा.अशी मागणी केली होती.सकल माळी समाजाच्या पदाधिकाऱ्यांनी पुढाकार घेत दोन्ही बाजूंमध्ये चर्चा घडवून आणली. यामुळे श्री कोके यांनी उपोषण स्थगित करण्यात आले. सकल माळी समाजाच्या मध्यस्थीने हा तोडगा निघाला असून समाजात समाधानाची भावना व्यक्त होत आहे.यावेळी सकल माळी समाजाचे सचिव राजेंद्र पडोळे,विश्वस्त विनोद पुंड यांनी सकल माळी समाजाच्या वतीने श्री.कोके यांच्या मागण्या मान्य करण्यासाठी प्रयत्न केले जातील. असे आश्वासन देण्यात आले. त्यानंतर श्री.कोके यांनी उपोषण तात्पुरते स्थगित करण्याचा निर्णय जाहीर केला. यावेळी प्रसाद कोके म्हणाले की, “समाजाने आमच्या मागण्यांबाबत सकारात्मक भूमिका घेतली आहे.ठरलेल्या कालावधीत मागण्या मान्य न झाल्यास आम्ही पुन्हा उपोषणाचा मार्ग अवलंबू.” या मध्यस्थीमुळे तणावपूर्ण वातावरणात काही प्रमाणात दिलासा मिळाला असून पुढील घडामोडीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## नगर तालुक्यात अनोळखी पुरूषाचा मृतदेह आढळला

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

वांबोरी घाटामध्ये डोंगरगण (ता. अहिल्यानगर) शिवारात वन विभागाच्या हद्दीत एका अज्ञात पुरूषाचा मृतदेह दोन गोणीत टाकून दरीत फेकल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. सदर व्यक्तीची हत्या करून पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने मृतदेह या ठिकाणी आणून टाकल्याचा अंदाज पोलिसांनी वर्तविला आहे. याप्रकरणी एमआयडीसी पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरूध्द खुनाचा गुन्हा दाखल केला आहे. पोलीस अंमलदार ज्ञानेश्वर तांदळे यांनी यासंदर्भात फिर्याद दिली आहे. वांबोरी घाटात दरीतील झुडपामध्ये गोणीत मृतदेह असल्याची माहिती एमआयडीसी पोलिसांना मंगळवारी (१७ फेब्रुवारी) सकाळी मिळाली. माहिती मिळताच नगर ग्रामीणचे पोलीस उपअधीक्षक शिरीष वमने, सहायक निरीक्षक माणिक चौधरी यांनी पथकासह घटनास्थळी धाव घेतली. फॉरेन्सिक टीम, रूग्णवाहिकेला घटनास्थळी पाचारण करण्यात आले. गोणीसह मृतदेह ताब्यात घेऊन तो रूग्णवाहिकेतून जिल्हा शासकीय रूग्णालयात दाखल करण्यात आला. तेथे शवविच्छेदन करण्यात आले आहे. ३५ ते ४० वर्षीय अनोळखी पुरूषाचा तो मृतदेह असून त्याचा खून झाला असल्याचे समोर आले आहे. त्यानुसार पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल केला आहे. सदर व्यक्तीचा खून करून पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने मृतदेह या ठिकाणी आणून टाकल्याचा अंदाज पोलिसांनी वर्तविला आहे. त्यादृष्टीकोनातून तपास सुरू केला आहे.

## रत्नपारखी, थोरात व अंधारे यांचा होणार सन्मान

- ग्रामीण मराठी साहित्य संमेलनात कला क्षेत्रातील योगदानाचा गौरव

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

कला व सांस्कृतिक क्षेत्रातील उल्लेखनीय आणि सातत्यपूर्ण कार्याबद्दल नाट्य अभिनेत्री गौरी रत्नपारखी, लावणी सम्राज्ञी रोहिणी थोरात सांगवीकर तसेच लावणी नृत्यांगना सारिका चंद्रकांत अंधारे (नगरकर) यांना यंदाचा राज्यस्तरीय छबुबाई नगरकर लोककलावंत पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. निमगाव वाघा (ता. नगर) येथे छत्रपती शिवाजी महाराज आणि संत गाडगे महाराज यांच्या जयंतीनिमित्त दि.१९ फेब्रुवारी रोजी पाचवे राज्यस्तरीय ग्रामीण मराठी साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले आहे. या संमेलनात कला व सांस्कृतिक क्षेत्रात भरीव योगदान देणाऱ्या या तीन मान्यवर महिला कलाकारांचा सन्मान करण्यात येणार असल्याची माहिती संमेलनाचे संयोजक तथा डोंगरे संस्थेचे अध्यक्ष पै. नाना डोंगरे यांनी दिली. अभिनेत्री गौरी रत्नपारखी यांनी अनेक मराठी नाटक व सिनेमामध्ये प्रमुख भूमिका साकारत रसिकांची मने जिंकली आहेत. मराठी व हिंदी मालिकांबरोबरच चित्रपट आणि वेब सिरीजमधूनही त्यांनी आपली अभिनयकला सिद्ध केली आहे. राष्ट्रीय पुरस्कारप्राप्त बाबू बँड बाजा या चित्रपटातील त्यांच्या भूमिकेचे विशेष कौतुक झाले होते. साहित्य क्षेत्रातही त्यांची उल्लेखनीय कामगिरी आहे. त्यांच्या ‘नसतोस घरी तू जेव्हा!’ या पुस्तकाला २०२५ सालचा पु. ल. देशपांडे विनोदी साहित्य पुरस्कार प्राप्त झाला आहे. अभिनयासोबत लेखन क्षेत्रातही त्यांनी आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. अभिनेत्री व लावणी सम्राज्ञी रोहिणी थोरात सांगवीकर यांनी अहिल्यानगर आणि पुणे येथे आयोजित लावणी महोत्सवांमध्ये प्रभावी सादरीकरण करून अनेक पुरस्कार मिळवले आहेत.

विविध मराठी चित्रपट व नाटकांमध्ये त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका साकारल्या आहेत. त्यांच्या ठसकेबाज शैलीमुळे आणि पारंपरिक लावणीला आधुनिकतेची जोड देणाऱ्या सादरीकरणामुळे त्या रसिकांच्या विशेष पसंतीस उतरल्या आहेत.

## "स्वराज सीड्स" कंपनीच्या गव्हाचे विक्रमी उत्पादन

- चास येथे गहु पिकाची पाहणी व शेतकरी परिसंवादात उस्फूर्त प्रतिसाद
- "स्वराज -२५" या बियाणांचा वापर करून उत्पन्न मिळवावे- कांतीभाई कामानी

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**



चास येथे पोपट घुंगार्डे या शेतकऱ्यांने शेतात स्वराज्य-२५ या बियाणाची पेरणी केली असता गव्हाची लांबी व वाढ जोमात झालेली दिसत आहे. तसेच रोगप्रतिकार शक्ती चांगली असल्याने हा गहू कोणत्याही रोगराईला बळी पडत नाही. एकरी ३० ते ३५ क्विंटल गव्हाचे विक्रमी उत्पादन मिळते.शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात "स्वराज-२५" या गहु बियाणांचा वापर करून उत्पन्न मिळवावे.असे प्रतिपादन गुजरात येथील स्वराज सीड्स कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर कांतीभाई कामानी यांनी केले आहे. चास येथे स्वराज सीड्स गुजरात आणि हरितक्रांती कृषी सेवा केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने गहू वाण स्वराज २५ प्रत्यक्ष पिक पाहणी कार्यक्रम व शेतकरी परिसंवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. चास येथील शेतकरी भाऊसाहेब घुंगार्डे यांनी गुजरात,गांधीनगर येथील स्वराज सीड्स कंपनीचे "स्वराज २५" गहु बियाणाची पेरणी केली.या गव्हाच्या शेतीची पाहणी करण्यासाठी गुजरात, गांधीनगर येथील स्वराज सीड्स कंपनीचे प्रतिनिधी जयंत धांडे व जिल्हा वितरक मे.अजय सीड्सचे संचालक अजय मुथा आले असता गहु या पिकाची चांगली वाढ व ओंबी त मोठ्या प्रमाणात वाढ झालेली पाहून समाधान व्यक्त केले. यावेळी सरपंच युवराज कार्ले,सेवानिवृत्त कृषी अधिकारी माधव देशमुख,पोपट घुंगार्डे,राजेंद्र गावखरे, हरीतक्रांती कृषी केंद्राचे गणेश पवार,बाळासाहेब पवार,विशाल लामखडे,दीपक कारले सुनील गोंडाळ,बापू काळे,विलास कार्ले,अरुण गोंडाळ,शिवाजी कार्ले,विशाल जाधव,संदीप वाळुंज,सुभाष वाळुंज,जगदीश पवार,सचिन कार्ले,नवनाथ गोंडाळ,सुभाष कार्ले,पांडुरंग कार्ले, एस.टी. पादिर,सहदेव पवार,बाजीराव घुंगार्डे अभी घुंगार्डे सचिन देवकर,दादा ठाणगे, संदीप कार्ले ,संदेश कार्ले ,प्रमोद दिवटे,चंदू इरोले,डीडी कार्ले, आदींसह चास येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सेवा निवृत्त कृषी अधिकारी माधव देशमुख म्हणाले,"स्वराज -२५" गहु अतिशय चांगला व जास्त उत्पन्न देणारा आहे.असे संशोधनात पुढे आले आहे. संशोधित बियाणे असल्यामुळे पेरणीसाठी बियाणे कमी लागते.या गव्हाच्या पेरणीसाठी शेतकऱ्यांची मागणी मोठ्या प्रमाणात आहे. तांबेरा या रोगाला हा बळी पडत नाही.तसेच या गव्हाची उत्कृष्ट प्रतीची स्वादिष्ट व रुचकर,सफेद रंगाची चपाती तयार होते.

पोपट घुंगार्डे म्हणाले, स्वराज कंपनीच्या गव्हाची पेरणी केली असता पहिल्यांदाच एवढा मोठा प्रमाणात पिकाची वाढ झालेली आहे.एकरी उत्पन्न ३५ क्विंटल अपेक्षित आहे. प्रत्येक शेतकरी बांधवांनी गावाचे उत्पादन मोठ्या प्रमाणात करण्यासाठी स्वराज २५ या गव्हाची पेरणी करावी.

अजय मुथा म्हणाले,शेतकरी पोपट घुंगार्डे यांनी पेरणीसाठी बियाणे नेले होते.येथे पिकांची पाहणी केली असता उत्तम प्रकारे गव्हाची वाढ व ओंबी ची चुड झालेली दिसत आहे.

किमान एकरी ३५ क्विंटल एवढे उत्पादन मिळून गव्हाच्या दाण्याचा कलर सोनेरी असल्यामुळे बाजारभाव चांगला मिळेल. शेतकऱ्यांनी "स्वराज २५" या बियाणांची पेरणी करून जास्तीत जास्त उत्पादन करुन फायदा मिळवावा.असे सांगितले.

# जिजाऊंचा 'शिवबा' ते विश्वाचे 'छत्रपती': एका ६५ वर्षीय कृतज्ञ शिवभक्ताचे चिंतन

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**




आज १९ फेब्रुवारी २०२६. मी आयुष्याची ६५ वर्षे पूर्ण करून, अनुभवांच्या गाठीशी बांधलेल्या एका वळणावर उभा आहे. या वयात पोहचल्यावर जेव्हा मी मागे वळून पाहतो, तेव्हा मला जाणवतं की, आपण 'छत्रपतीं'चा जयजयकार करण्यात आयुष्य घालवलं, पण त्या महापुरुषाला घडवणाऱ्या 'घडणयंत्राचा' (The Crafting Process) विचार करायला आपण थोडं विसरलो. महाराजांच्या आयुष्यातील प्रत्येक पाऊल हे 'अशक्य' होतं, पण ते 'शक्य' झालं कारण त्यांच्या पाठीशी जिजाऊंचे संस्कार आणि गुरूंची दूरदृष्टी होती. चला, यंदाची शिवजयंती या 'घडवणुकीच्या' कृतज्ञतेतून साजरी करूया.

१. जिजाऊ: संस्कारांचे विद्यापीठ : पुण्यातील लाल महालात जेव्हा जिजाऊंनी बाल शिवबांना रामायण-महाभारतातील गोष्टी सांगितल्या, तेव्हा त्या केवळ 'गोष्टी' नव्हत्या, तर ते 'केस स्टडीज' (Case Studies) होते. रामाने रावणाचा वध का केला? अन्यायाविरुद्ध उभे राहणे हे पाप का नाही? हे त्यांनी बालमनावर कोरलं.

शहाजीराजे कर्नाटकात असताना, जिजाऊंनी पुण्यात राहून ओसाड झालेलं गाव पुन्हा वसवण्यासाठी 'सोन्याचा नांगर' फिरवला. हा केवळ शेतीचा कार्यक्रम नव्हता, तर तो रयतेचा विश्वास संपादन करण्याचा संस्कार होता. आजचा धडा: आज आपण मुलांना महागडे कोचिंग क्लासेस लावतो, पण जिजाऊंसारखा 'संवाद' साधतो का? आई म्हणजे घराचं 'चारित्र्य' असते. जर मुलाला आईकडून प्रामाणिकपणाचे संस्कार मिळाले, तर तो भविष्यात कोणत्याही क्षेत्रात 'राजा' च बनेल.

२. गुरूंचे मार्गदर्शन: तलवारीला बुद्धीची जोड - महाराजांच्या आयुष्यात अनेक गुरूंचे योगदान लाभले. दादोजी कोंडदेवांनी त्यांना अश्वारोहण आणि प्रशासकीय शिस्त शिकवली, तर समर्थ रामदास स्वामी आणि संत तुकाराम महाराजांच्या विचारांनी त्यांना 'लोकाभिमुख' केलं. ऐतिहासिक दाखला: आग्र्याहून सुटका होताना महाराजांनी वापरलेली युक्ती ही केवळ चातुर्य नव्हती, तर ती 'शिस्तबद्ध नियोजनाचा' (Strategic Planning) कळस होता. जेव्हा परिस्थिती हाताबाहेर जाते, तेव्हा संयम कसा राखावा, हे त्यांना गुरूंच्या मार्गदर्शनातून मिळाले. वर्तणुकीत बदल: आपणही आपल्या आयुष्यात एक 'मार्गदर्शक' (Mentor) शोधला पाहिजे. ६५ व्या वर्षी मला जाणवतं की, वय कितीही झालं तरी शिकण्याची वृत्ती आपल्याला तरुण ठेवते.

३. निसर्ग आणि गड: स्वराज्याची फुफ्फुसे : छत्रपतींचे निसर्गप्रेम हे केवळ कवितांपुरते नव्हते, ऐतिहासिक दाखला: "गडावर आधी पाणी, मग तटबंदी" हे त्यांचे सूत्र होते. रायगडावर पाण्याचे टाके खोदताना त्यांनी जो दगड काढला, तोच दगड तटबंदीसाठी वापरला. हे आजच्या काळातील 'वेस्ट टू वेल्थ' (Waste to Wealth) चे उत्तम उदाहरण आहे. त्यांनी झाडांना 'लेकरांसारखे' मानले. माझी कृतज्ञता: 'ट्री मॅन ऑफ ठाणे' म्हणून कार्य करताना मला महाराजांच्या याच सूत्राने प्रेरणा दिली. यंदा आपण शिवजयंतीला अशा एका झाडाची जबाबदारी घेऊया, जे आपल्याला सावली देईल. पर्यावरणाची सेवा हीच खरी 'शिवसेवा' आहे.

४. वर्तन बदल: 'मी' कडून 'राष्ट्र' कडे : महाराजांनी कधीच स्वतःसाठी महल बांधले नाहीत, त्यांनी गड बांधले. त्यांनी स्वतःचा गादीचा लोभ धरला नाही, त्यांनी 'स्वराज्य' उभं केलं, कौटुंबिक समन्वय: जसे महाराजांनी मावळ्यांमध्ये 'belongingness' निर्माण केली, तशी आपण आपल्या कुटुंबात निर्माण करूया का? आपल्या मुलांशी, नातवंडांशी बसून त्यांच्या समस्या ऐकून घेणं, त्यांना महाराजांच्या गोष्टीतील 'मथितार्थ' सांगणं, हे संवाद सांधण्याचे काम करेल, अनोखी दृष्टी (Anomaly): आपण सणांना फटाके फोडून हवा प्रदूषित करतो, याउलट महाराजांच्या काळात सण म्हणजे रयतेला एकत्र आणून आनंद वाटणे असायचे. यंदा आपण 'झिरो वेस्ट' (Zero Waste) जयंती साजरी करून पृथ्वीचा सन्मान करूया.

६५ व्या वर्षी मला उमजलंय की, छत्रपती शिवाजी महाराज हे एक 'विचार' आहेत. जिजाऊंच्या संस्कारातून जन्माला आलेला हा विचार जर आपण आपल्या वर्तनात उतरवला, तर प्रत्येक घर एक 'संस्कार केंद्र' बनेल. माझा संदेश: आईचा आदर करा, निसर्गाला आई माना आणि समाजाला आपले कुटुंब समजा. हीच खरी 'समरसता' आणि हीच खरी 'हार्मनी', या जयंतीला आपण सर्वांनी मिळून प्रतिज्ञा करूया—"महाराजांनी जे स्वराज्य उभं केलं, ते सुराज्य करणं हीच आमची त्यांना खरी आदरांजली असेल." जय जिजाऊ! जय शिवराय!

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# जलसंधारण ही योजना नव्हे, लोकचळवळ – पोपट पवार

- डॉ. विखे पाटील अभियांत्रिकीत जलसंधारण विषयावर अखिल भारतीय सेमिनार संपन्न



**अहिल्यानगर :** (समर्थ गांवकरी)

जलसंधारण ही केवळ सरकारी योजना नसून ती लोकसहभागातून उभी राहणारी चळवळ आहे. पाणी अडवा–पाणी जिरवा, कंटूर बंडिंग, शेततळे, वृक्षलागवड व भूजल पुनर्भरण यांसारख्या उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी केली, तर दुष्काळग्रस्त भागही समृद्ध होऊ शकतो, असे प्रतिपादन पद्मश्री पुरस्कार विजेते व आदर्श गाव संकल्पनेचे प्रणेते पोपटराव पवार यांनी केले.

लोकसहभाग, पारदर्शकता, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, शाश्वत शेती पद्धती आणि युवकांचे नेतृत्व या घटकांवर भर दिल्यास जलसंधारण कार्यक्रम दीर्घकालीन यशस्वी ठरतात, असे त्यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात स्पष्ट केले.

अहिल्यानगर येथील विळद घाट मधील डॉ. विखे पाटील अभियांत्रिकी विद्यालयात द इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स (इंडिया), अहिल्यानगर लोकल सेंटर यांच्या वतीने आणि डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग यांच्या सहकार्याने “वॉटरशेड डेव्हलपमेंट अँड मॅनेजमेंट प्रोग्राम्स : मॉनिटरिंग अँड इव्हॅल्युएशन” या विषयावर अखिल भारतीय सेमिनारचे आयोजन करण्यात आले. सेमिनारचा उद्घाटन समारंभ उत्साहात पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ९ वाजता नोंदणी प्रक्रियेसह झाली. डॉ.पी.एस.गायके आणि इंजि.ए.के.राजे यांनी मान्यवरांचे स्वागत केले. डॉ. विठ्ठलराव विखे पाटील तसेच डॉ.बाळासाहेब विखे पाटील यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून व दीपप्रज्वलनाने उद्घाटन करण्यात आले.

प्रमुख पाहुणे अ‍ॅड. वसंत कापरे यांनी जलव्यवस्थापनाच्या गरजेवर भाष्य करताना तंत्रज्ञानाधारित निरीक्षण व मूल्यमापन प्रणालींचे महत्त्व अधोरेखित केले. सन्माननीय अतिथी महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.व्ही. के.खरचे, मॉडेल व्हिलेज प्रोग्राम चे संचालक पद्मश्री पोपटराव पवार, डॉ.व्ही.पी.सिंग (डिस्टिंग्विश्ड प्रोफेसर एमेरिटस, Texas A&M University, अमेरिका) आदी उपस्थित होते. त्यांनी जलव्यवस्थापनातील संशोधन, लोकसहभाग आणि आंतरराष्ट्रीय अनुभव यावर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमात इंजि. बी. पी. भगवत (अध्यक्ष, आयईआय –एएलसी) यांनी आयईआय विषयी माहिती दिली. डॉ. ए. ए. अत्रे (संयोजक) यांनी सेमिनारच्या उद्दिष्टांची माहिती दिली. सूत्रसंचालनात डॉ.व्ही. पी.सिंग व डॉ. व्ही. के. खरचे यांची ओळख करून देण्यात आली त्यांनी देखील मार्गदर्शनपर भाषणे केली.

सेमिनारच्या आयोजनासाठी कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.बी.राऊत, अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आर. आर.नवथर, आयोजक सचिव डॉ.व्ही.एन.बाराई, सहसंयोजक डॉ.एस.बी.नंदगुडे, संयोजक डॉ.ए.ए.अत्रे, आईआय एएलसी चे मानद सचिव डॉ.डी.ए.विधाते, आयईआय एएलसी चे अध्यक्ष बी.पी.भगवत, इंजि.ए.के.राजे यांनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमाच्या शेवटी डॉ.व्ही. एन.बाराई यांनी आभार प्रदर्शन केले.राष्ट्रगीताने उद्घाटन समारंभाची सांगता झाली. त्यानंतर मुख्य सत्रात जलसंधारण विषयावर विशेष व्याख्याने पार पडली. देशभरातील प्राध्यापक, संशोधक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. जलसंधारण व शाश्वत विकासाच्या दृष्टीने हा सेमिनार मार्गदर्शक ठरेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला.

# अस्वलाच्या हल्ल्यात दुसऱ्या व्यक्तीचा मृत्यू

- वारसांना शासनाकडून १० लाखांची मदत
- आ. भिमराव केराम यांचा यशस्वी पाठपुरावा




**किनवट :** (समर्थ गांवकरी)

किनवट तालुक्यातील वनक्षेत्रात अस्वलाच्या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या व्यक्तीचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना समोर आली आहे. या घटनेनंतर शासनाकडून तात्काळ मदत म्हणून वारसांना १० लाख रुपयांचा धनादेश देण्यात आला. तालुक्यातील रहिवासी चंद्रसिंग शेषेराव राठोड यांच्यावर दिनांक १० फेब्रुवारी २०२६ रोजी वन्यप्राणी अस्वलाने अचानक हल्ला केला होता. या हल्ल्यात ते गंभीर जखमी झाले होते. त्यांना तातडीने पुढील उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर येथील शासकीय रुग्णालय ‘घाटी’ येथे दाखल करण्यात आले होते. मात्र डॉक्टरांच्या अथक प्रयत्नांनंतरही उपचारादरम्यान दिनांक १६ फेब्रुवारी २०२६ रोजी त्यांचा मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. शासनाच्या वन्यप्राणी हल्ला नुकसानभरपाई योजनेअंतर्गत मृताच्या वारसांना तातडीची आर्थिक मदत देण्याची प्रक्रिया वनविभागामार्फत पूर्ण करण्यात आली. यानुसार मृताच्या पश्चात वारसदार म्हणून पत्नी कल्पनाबाई चंद्रसिंग राठोड, मुलगा कुमार चंद्रसिंग राठोड आणि मुलगा धर्मराज चंद्रसिंग राठोड यांना शासन नियमांनुसार १० लाख रुपयांचा धनादेश प्रदान करण्यात आला. हा धनादेश वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा.) आप्पारावपेठ उमेश ढगे यांच्या हस्ते देण्यात आला. यावेळी वनपरिमंडळ अधिकारी आप्पारावपेठ श्रीराम व्ही. सज्जन, वनरक्षक डी. डी. कडमपल्ले, कृष्णा घायाळ, आर. आर. वनवे, संतोष सारगुडे, गणेश सपकाळ, बी. टी. जाधव, वसंत भालेराव, वाहन चालक ज्ञानेश्वर माहुरे तसेच संगणक चालक कुलदीप पाटील उपस्थित होते.

# अर्थसंकल्पीय अधिवेशनात प्रश्न उपस्थित करणार

**नायगाव :** (समर्थ गांवकरी)



नायगाव तालुक्यातील व राज्यातील जिल्हा परिषद, नगरपालिका व महानगरपालिका शाळांमध्ये भौतिक सुविधांची कमतरता, शिक्षकांची अपुरी संख्या तसेच वाढत्या अशैक्षणिक कामांमुळे विद्यार्थीसंख्या घटत असून अनेक शाळा बंद होण्याच्या मार्गावर आहेत. या पार्श्वभूमीवर सरकारी व मराठी माध्यमाच्या शाळा वाचविण्याचा प्रश्न येत्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात उपस्थित करणार असल्याचे आश्वासन आ जितेश अंतापुरकर यांनी दिले. प्रा. डॉ. शंकर गड्डमवार व त्यांच्या सहकाऱ्यांनी आ. अंतापुरकर यांची भेट घेऊन याबाबत निवेदन सादर केले. जिल्हा परिषद व इतर सरकारी शाळा बंद पडल्यास ग्रामीण व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांचे शिक्षण धोक्यात येईल. त्यामुळे शाळांमध्ये आवश्यक भौतिक सुविधा उपलब्ध करून देणे, रिक्त शिक्षक पदे तत्काळ भरणे तसेच शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. यावेळी आ. अंतापुरकर यांनी देगलूर-बिलोली मतदारसंघात सर्व आवश्यक भौतिक सुविधा उपलब्ध करून पायलट प्रकल्पाच्या स्वरूपात शाळा सक्षम करण्याचा प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. या उपक्रमाला जनतेचा प्रतिसाद मिळाल्यास राज्यातील सर्व मराठी माध्यमाच्या सरकारी शाळांमध्ये सुविधा उपलब्ध करून देणे, सीबीएसई धर्तीचा अभ्यासक्रम लागू करणे तसेच शिक्षक भरतीसाठी शासन स्तरावर पाठपुरावा करणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, याच मागण्यांचे निवेदन नांदेड जिल्ह्यातील आ हेमंत पाटील, बालाजी कल्याणकर, राजेश पवार, प्रताप पाटील चिखलीकर व श्रीजयाताई चव्हाण यांच्या कार्यालयातही देण्यात आले आहे.

# राज्यात दिमाखदार यश

**श्रीगोंदा :** (समर्थ गांवकरी)


राज्यस्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेत शास्त्रंग मार्शल आर्ट प्रकारात श्रीगोंदा येथील वेंकटेश पोदार लर्न स्कूल च्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करून शाळेच्या नावलौकिकात भर घातली आहे. छत्रपती संभाजीनगर येथे विभागीय क्रीडा संकुलात दि. १६ व १७ फेब्रुवारी २०२६ रोजी पार पडत असलेल्या या स्पर्धेत राज्यभरातील खेळाडूंनी सहभाग घेतला होता. १९ वर्षांखालील गटात झालेल्या लढतींमध्ये वेंकटेश पोदार स्कूलच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कौशल्य दाखवले. १९ वर्षांखालील मुली गटात ईशा संतोष गोरे हिने दमदार खेळ करत सुवर्णपदक पटकावले. तसेच १९ वर्षांखालील मुले गटात सम्राटराजे चांगदेव पाचपुते याने कांस्यपदक मिळवून शाळेचा गौरव वाढवला.

# छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी होणार!

**डोंगरगाव (ता. अकोले):** (समर्थ गांवकरी)

अकोले तालुक्यातील डोंगरगाव येथे हिंदुराजा शिवजयंती उत्सव समिती व ग्रामस्थांच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात येणार आहे.

कार्यक्रमाची सुरुवात पहाटे ध्वजारोहणाने होईल. सकाळी ८ वाजता शिव अभिषेक, दुपारी ४ वाजता भव्य मिरवणूक आणि सायंकाळी ८ वाजता महाआरतीचे आयोजन करण्यात आले आहे. जय मल्हार साउंड अकोले, शिवशंभो लाईट्स, पेपर ब्लास्टर तसेच फटाक्यांची आतषबाजी ही कार्यक्रमाची प्रमुख आकर्षणे असणार आहेत.



यावेळी आयोजकांनी सांगितले की, शिवजयंती हा केवळ उत्सव नसून एका महान विचारधारेचे स्मरण आहे. स्वाभिमान, न्याय, धैर्य आणि लोककल्याण यांचे प्रतीक असलेल्या शिवरायांच्या जीवनातून आजही संघर्षात न हार मानण्याची प्रेरणा मिळते.

गेल्या बारा वर्षांपासून सातत्याने हा उत्सव साजरा केला जात असून सुरुवातीला पाच रुपयांच्या वर्गणीपासून सुरू झालेला हा उपक्रम आज हजार रुपयांपर्यंत पोहोचला आहे. कार्यक्रम अधिक भव्य झाला असला तरी श्रद्धा आणि एकतेची भावना तितकीच दृढ असल्याचे आयोजकांनी नमूद केले.

गावातील व परिसरातील शिवप्रेमी बांधवांच्या सहकार्यामुळे हा उत्सव यशस्वी होत असून कुणी आर्थिक मदत, तर कुणी श्रमदान करून सहभाग नोंदवत आहेत. शिवरायांनी दिलेल्या अन्यायाविरुद्ध उभे राहण्याच्या, माणुसकी जपण्याच्या आणि एकतेच्या संदेशाचे पालन करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

तरुण पिढीने शिक्षण, शिस्त, देशप्रेम आणि सामाजिक बांधिलकी यांचा स्वीकार करून शिवरायांचे विचार जीवनात उतरवावेत, असेही आवाहन करण्यात आले. शेवटी सर्व शिवप्रेमींना एकत्र येऊन जात, धर्म, भाषा यापलीकडे जाऊन माणुसकी जपण्याची शपथ घेण्याचे आवाहन करण्यात आले. जय भवानी! जय शिवाजी!

# ‘निर्भय कन्या अभियान’ कार्यशाळा उत्साहात संपन्न

**अहमदनगर :** (समर्थ गांवकरी)



अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे, श्री ढोकेश्वर कॉलेज, टाकळी ढोकेश्वर. येथे ‘निर्भय कन्या अभियान’ अंतर्गत आयोजित करण्यात आलेली कार्यशाळा उत्साहात आणि मोठ्या प्रतिसादात संपन्न झाली. या कार्यशाळेचा उद्देश विद्यार्थिनींमध्ये आत्मविश्वास, स्वसंरक्षणाची जाणीव आणि कायदेशीर हक्कांविषयी जागरूकता निर्माण करणे हा होता.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे. विद्यार्थी विकास मंडळ व श्री ढोकेश्वर कॉलेज,टाकली ढोकेश्वर यांच्या संयुक्त विद्यमाने “निर्भय कन्या अभियान कार्यशाळेचे” आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते वृक्षाला जल अर्पण करून कार्यशाळेचे उद्घाटन करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या अ‍ॅड. वैशाली हेमंत कराळे यांनी महिलांच्या सुरक्षेसंबंधी कायदे, सायबर गुन्हे प्रतिबंध, तसेच दैनंदिन जीवनात स्वसंरक्षणाचे महत्त्व याविषयी मार्गदर्शन केले. विद्यार्थिनींनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवत विविध प्रश्न विचारून शंकानिरसन करून घेतले.तसेच या कार्यशाळेसाठी श्रीमती निलिमा देशपांडे या देखील उपस्थित होत्या.

कार्यशाळेच्या द्वितीय सत्रासाठी मास्टर ट्रेनर मा. श्री. विकास पवार यांनी विद्यार्थिनींना स्वसंरक्षणाचे धडे दिले व स्वतःचे रक्षण करण्यासाठी कराट्यांचे विविध प्रकार सांगितले. तसेच आपण स्वतःवर प्रेम केले पाहिजे असे प्रतिपादन केले.

या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लक्ष्मणराव मतकर यांनी आपल्या मनोगतातून सांगितले की, मुलींनी शिक्षणासोबतच आत्मसंरक्षणाचे कौशल्य आत्मसात करणे काळाची गरज आहे. महाविद्यालयात अशा उपक्रमांमुळे विद्यार्थिनींमध्ये धैर्य आणि आत्मविश्वास वाढीस लागतो. या कार्यशाळेचे आयोजन निर्भय कन्या अभियान समन्वयक डॉ. वैशाली गंगोत्री यांनी केले होते. प्रास्ताविक प्रा. शांता गडगे यांनी केले तर, पाहुणे परिचय प्रा. अनुराधा गायखे यांनी क्कारून दिला. कार्यक्रमाचे सूत्र संचालन कु. साक्षी अशोक खरमाळे व कु. साक्षी रावसाहेब खरमाळे तर आभार प्रा. अंकिता भूनिया यांनी व्यक्त केले. कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनाबद्दल विद्यार्थिनी व प्राध्यापकांनी समाधान व्यक्त केले. ही कार्यशाळा विद्यार्थिनींसाठी प्रेरणादायी ठरली असून, अशा उपक्रमांमुळे त्यांच्यात आत्मविश्वास आणि सुरक्षिततेची जाणीव अधिक दृढ होते, असे मत उपस्थितांनी व्यक्त केले. कार्यक्रमासाठी विद्यार्थिनी व प्राध्यापक मोठ्या संखेने उपस्थित होते.

# अल्पवयीन मुलीवर अत्याचार

**अहिल्यानगर :** (समर्थ गांवकरी)

लग्नाचे आमिष दाखवून एका १५ वर्षीय अल्पवयीन मुलीवर वेळोवेळी अत्याचार केल्याची धक्कादायक घटना अहिल्यानगरमध्ये उघडकीस आली आहे. या प्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात नराधम आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता आणि पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून संपूर्ण जिल्ह्यात या घटनेने खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सावेडी परिसरातील रहिवासी असलेल्या सुरज शरद गायकवाड याने पीडित मुलीला लग्नाचे आमिष दाखवले होते. सप्टेंबर २०२४ पासून ते ७ फेब्रुवारी २०२६ पर्यंत आरोपीने पीडितेला अरणगाव येथील एका हॉटेलमधील खोलीत नेऊन तिच्यावर वारंवार बळजबरीने शारीरिक संबंध ठेवले.

# भंडारदरा अभयारण्य परिसरातल्या वन्यजीवांकडून पिकांचे नुकसान; पंचनाम्याची शेतकऱ्यांची मागणी!

**अहिल्यानगर :** (समर्थ गांवकरी)

भंडारदरा अभयारण्य परिसरातील गावांमध्ये वन्यजीवांकडून शेती पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. मुतखेल, रतनवाडी, घाटघर आदी भागातील भुईमूग, भाजीपाला, टोमॅटो, ज्वारी, बाजरी, गहू, हरभरा आदी पिकांचे रानडुक्कर, हरिण, गवा, माकड, वानर यांच्याकडून रातोरात नुकसान होत असल्याची तक्रार करण्यात आली आहे.

वैभव पिचड यांच्या मार्गदर्शनाखाली समाजसेवक अनंत महादू घाणे व शेतकरी प्रतिनिधींनी वन विभागाकडे निवेदन सादर केले. यामध्ये कृउबाससं. तुकाराम खाडे, सखाराम उंबरे, बुधा पाटील इदे, अमृता झडे, बाजीराव सगभोर, हनुमंता बुळे, योगेश खाडे,



सुभाष बांडे, तुकाराम सारुकते, किसन आंबवणे आदींसह अनेक शेतकऱ्यांचा सहभाग होता. शेतकऱ्यांनी उमेश गावित (RFO) यांना निवेदन देऊन तात्काळ पंचनामे करून शासनाकडून नुकसान भरपाई देण्याची मागणी केली. बैठकीत शेती संरक्षणासाठी ठोस उपाययोजना करण्याची गरज व्यक्त करण्यात आली. अभयारण्यात व लगतच्या क्षेत्रात आंबा, चिंच, पिंपळ, आवळा, वड, उंबर आदी फळझाडे मोठ्या प्रमाणात लावून वन्यप्राण्यांसाठी नैसर्गिक खाद्य उपलब्ध करून द्यावे, तसेच नैसर्गिक व कृत्रिम पाणवठे तयार करावेत, अशी सूचना करण्यात आली. पर्यटकांकडून होणारा प्लास्टिक कचरा टाळण्यासाठी कचराकुंड्या बसवून प्लास्टिकविरोधी जनजागृती मोहीम राबवावी, अशी मागणीही करण्यात आली. दरम्यान, परिसरात बिबट्यांची संख्या वाढल्याने पाळीव जनावरांवर हल्ल्यांच्या घटना वाढल्या आहेत. अनेकदा बिबट्या शिकार घेऊन निघून जातो व पुरावा न मिळाल्याने पंचनामा करण्यात अडचणी येतात, अशी शेतकऱ्यांची व्यथा आहे.

त्यामुळे प्रशासनाने परिस्थितीची दखल घेऊन शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी करण्यात आली. यावर गावित साहेब यांनी शेतकऱ्यांच्या मागण्यांची दखल घेत लवकरच पंचनामे करून आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन दिले.

# “माझी वसुंधरा अभियान ५.०” मध्ये ठाणे जिल्ह्याची कामगिरी

**ठाणे :** (समर्थ गांवकरी)

पृथ्वी, वायू, जल, अग्नी आणि आकाश या निसर्गाशी संबंधित पंचतत्त्वांच्या जतन व संवर्धनासाठी राज्य शासनामार्फत राबविण्यात येणारे “माझी वसुंधरा अभियान” दिनांक २ ऑक्टोबर २०२० पासून राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये सुरू करण्यात आले. या अभियानाचा पाचवा टप्पा म्हणजेच “माझी वसुंधरा अभियान ५.०” हा दिनांक १ जून २०२४ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत राज्यभर राबविण्यात आला. ठाणे जिल्ह्याने या अभियानात उल्लेखनीय कामगिरी करत विभाग स्तरावर मानाचे स्थान पटकावले आहे. विभाग स्तरावर सर्वोत्तम कामगिरी करणारे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून ठाणे जिल्ह्याला द्वितीय क्रमांक प्राप्त झाला आहे. विभाग स्तरावर सर्वोत्तम कामगिरी करणारे गट विकास अधिकारी म्हणून पंचायत समिती मुरबाड, तसेच जिल्ह्यात सर्वोत्तम कामगिरी करणारे गट विकास अधिकारी म्हणून पंचायत समिती भिवंडी यांची निवड करण्यात आली आहे. याबद्दल सर्वांचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात येत आहे. या टप्प्यात राज्यातील ४२२ नागरी स्थानिक संस्था व २७,८९५ ग्रामपंचायती अशा एकूण २८,३१७ स्थानिक स्वराज्य संस्थांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. या अभियानांतर्गत पर्यावरण संवर्धन, जलसंधारण, वृक्षारोपण, स्वच्छता उपक्रम, ऊर्जा बचत, कचरा व्यवस्थापन आदी विविध उपक्रम राबविण्यात आले. अभियानातील कामगिरीच्या आधारे शासनाकडून स्थानिक स्वराज्य संस्थांचे मूल्यमापन करून उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या संस्था व अधिकाऱ्यांना रोख पारितोषिके जाहीर करण्यात आली आहेत.

# एपीआय प्रल्हाद गीते यांची राहुरीला बदली

## गणेश वारूळेंकडे नगर तालुका पोलीस ठाण्याचा पदभार

**अहिल्यानगर :** (समर्थ गांवकरी)

अरणगाव (ता. अहिल्यानगर) येथील मिठू कार्तिक दत्त (वय ४२) यांच्या मारहाणीतून झालेल्या मृत्यूनंतर खुनाचा गुन्हा दाखल करण्यास टाळाटाळ केल्याच्या आरोपावरून तपास अधिकारी तथा अहिल्यानगर तालुका पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रल्हाद गीते यांची राहुरी पोलीस ठाण्यात बदली करण्यात आली आहे.

तोफखाना पोलीस ठाण्यातील सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश वारूळे यांच्याकडे तालुका पोलीस ठाण्याचा प्रभारी पदभार देण्यात आला आहे. दरम्यान, गीते यांची खातेनिहाय चौकशी सुरू असून अहिल्यानगर ग्रामीणचे पोलीस उपअधीक्षक शिरीष वमने हे चौकशी करत आहेत. त्यांच्या अहवालानंतर पुढील कारवाई केली जाईल, असे पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी सांगितले. ६ मार्च २०२५ रोजी मिठू दत्त यांना निर्घृण मारहाण करण्यात आली. सुरूवातीला त्यांना अहिल्यानगरमधील खासगी रूग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र प्रकृती गंभीर झाल्याने त्यांना पुणे येथे हलविण्यात आले. २३ मार्च रोजी त्यांचा मृत्यू झाला. तथापि, २९ मार्च रोजी अहिल्यानगर तालुका पोलीस ठाण्यात केवळ ‘अकस्मात मृत्यू’ची नोंद करण्यात आली.

पुढील तपास स्वतः एपीआय गीते यांनी हाताळला; मात्र खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला नाही. तक्रार झाल्यानंतर अधीक्षक घार्गे यांनी तात्काळ दखल घेत सुपा पोलीस ठाण्याच्या निरीक्षक ज्योती गडकरी यांच्याकडे चौकशी सोपविली. गडकरी यांच्या तपासात धक्कादायक बाबी समोर आल्या. मिठू दत्त यांचा मृत्यू अपघाती नसून मारहाणीमुळे झालेला खून असल्याचे स्पष्ट झाले. त्यानुसार पाच जणांविरूध्द खुनासह विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सुरुवातीपासून खुनाचा गुन्हा का दाखल करण्यात आला नाही? घटनेचे व्हिडिओ पुरावे असतानाही प्रकरण ‘अकस्मात मृत्यू’ म्हणून का ठेवण्यात आले? आरोपींशी आर्थिक तडजोड झाली का? तपासात जाणीवपूर्वक विलंब का करण्यात आला? या प्रश्नांची उत्तरे अद्याप मिळालेली नाहीत.

मात्र, गडकरी यांच्या तपासामुळे गीते यांच्या भूमिकेबाबत गंभीर संशय निर्माण झाला आहे. गीते यांची खातेनिहाय चौकशी करण्याचे आदेश अधीक्षक घार्गे यांनी दिले असून ही चौकशी उपअधीक्षक वमने यांच्याकडून सुरू आहे. चौकशी सुरू झाल्यानंतरही गीते यांचे प्रभारीपद कायम होते. आता मात्र अधीक्षक घार्गे यांनी त्यांची बदली राहुरी पोलीस ठाण्यात केली आहे. खातेनिहाय चौकशी पूर्ण झाल्यानंतर उपअधीक्षक वमने हे अधीक्षक घार्गे यांना अहवाल सादर करतील आणि त्यानंतर पुढील कारवाई अपेक्षित आहे.

अहिल्यानगर तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीत खून,



खुनाचा प्रयत्न, रस्तालूट, चोरी व घरफोड्यांच्या घटनांचे सत्र सुरूच असल्याने कायदा व सुव्यवस्थेबाबत चिंता व्यक्त होत आहे. रूईछत्तीशी येथे सुरू असलेला वेश्याव्यवसाय बंद करण्यासाठी ग्रामस्थांना उपोषण करावे लागले होते. हे आंदोलन सोडविण्यासाठी स्वतः अधीक्षक घार्गे यांना जावे लागले होते. त्यामुळे तालुका पोलिसांच्या कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. दरम्यान, सहाय्यक निरीक्षक गणेश वारूळे यांच्याकडे प्रभारी पदभार सोपविण्यात आला असून तालुक्यातील कायदा व सुव्यवस्था सुरळीत करण्याची मोठी जबाबदारी त्यांच्या खांद्यावर आली आहे. खमक्या अधिकारी म्हणून ओळख असलेले वारूळे तालुक्यात कायदा सुव्यवस्थेची घडी बसवतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# रंगद्रव्य उत्पादक 'सुदर्शन'ची जागतिक भरारी

## ७५ वर्षांत १९ उत्पादन केंद्रांसह १२० देशांत विश्वासार्ह सेवा; शाश्वत विकासासाठी सामाजिक कार्यातही पुढाकार

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

रंगद्रव्य उत्पादनांत अग्रेसर असलेल्या सुदर्शन केमिकल्स इंडस्ट्रीज लिमिटेडने आपला अमृत महोत्सव साजरा करतानाच जागतिक भरारी घेतली आहे. ७५ वर्षांचा प्रवास पूर्ण करताना जर्मनीस्थित ह्युबॅक ग्रुपचे अधिगृहण करताना १२० पेक्षा अधिक देशांत रंगद्रव्य उत्पादनांची सेवा देणारी सुदर्शन केमिकल एकात्मिक जागतिक कंपनी बनली आहे. 'वन सुदर्शन' या संकल्पनेंतर्गत विविध घटक, तंत्रज्ञान आणि संस्कृतींना एकत्र आणून सातत्यपूर्ण, उच्च कार्यक्षम व शाश्वत रंग उपाय देण्यावर कंपनीचा भर आहे.

पुण्यात १९५१ मध्ये स्थापन झालेल्या सुदर्शन केमिकल इंडस्ट्रीज लिमिटेडने गेल्या ७५ वर्षांत विश्वासार्ह व ग्राहकाभिमुख




सेवा देत रायगड जिल्ह्यातील रोहा व महाडसह जगभरात १९ उत्पादन केंद्र, १२० देशांत रंगद्रव्यांचा पुरवठा व हजारो कर्मचाऱ्यांना रोजगाराची संधी दिली आहे. गेल्या सात दशकांत सुदर्शनने कोटिंग्स, प्लास्टिक्स, शाई, सौंदर्यप्रसाधने आणि विशेष अनुप्रयोगांसाठी वापरल्या जाणाऱ्या रंगद्रव्य क्षेत्रात विश्वासार्ह जागतिक भागीदार म्हणून ओळख निर्माण केली आहे.

सुदर्शन केमिकल्स इंडस्ट्रीज लिमिटेडचे ग्लोबल चेअरमन व मुख्य कार्यकारी अधिकारी राजेश राठी म्हणाले, "७५ वर्षांचा प्रवास साजरा करताना आनंदाची भावना आहे. कंपनीच्या सुरुवातीपासून साधेपणा, काटेकोर अंमलबजावणी, ग्राहक व नियामक मानकांचे पालन आणि शाश्वत उत्पादन यावर भर देण्यात आला. रायगड जिल्ह्यातील रोहा आणि महाड येथील उत्पादन प्रकल्पांनी या मूल्यांना बळकटी दिली असून, कंपनीच्या कार्यक्षमतेत आणि सामाजिक सहभागात त्यांची महत्त्वाची भूमिका आहे. 'सुदर्शन'ने मार्च २०२५ मध्ये जर्मनीस्थित ह्युबॅक ग्रुपचे अधिग्रहण केले. 'सुदर्शन'च्या प्रवासातील हा महत्वाचा टप्पा असून, यामुळे सुदर्शनची तांत्रिक क्षमता, उत्पादनाची व्यापकता आणि जागतिक स्तरावर अस्तित्व वाढले आहे."

"पुणे, रोहा आणि महाड येथे 'सुदर्शन'चा पाया आहे. मूल्यांवर आधारित आणि जबाबदारीची संस्कृती जोपासल्याने आम्हाला जागतिक स्तरावर अधिक मजबूत होता आले. ७५ वर्षांच्या या प्रवासातील मूल्यांना पुढे घेऊन जात औद्योगिक वाढीसोबतच शाश्वतता, सुरक्षितता आणि समाजविकासावरही आमचा भर राहील. आगामी काळात जागतिक ओळख अधिक मजबूत करत ग्राहक, कर्मचारी आणि समाजासोबत प्रगती साधण्याला प्राधान्य असणार आहे," असे त्यांनी नमूद केले.

# विंगमॅनएक्स अवॉर्ड्सने रायडिंग समुदायाचा आणि त्याला एकत्र जोडून ठेवणाऱ्या व्यक्तींचा केला सन्मान

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

विंगमॅनएक्स अवॉर्ड्स २०२५–२६ चा पहिला सोहळा हयात हॉटेल, पुणे येथे यशस्वीरीत्या पार पडला. या कार्यक्रमात जबाबदारी, नेतृत्व आणि अर्थपूर्ण योगदानाद्वारे भारताच्या मोटरसायकलिंग संस्कृतीला आकार देणाऱ्या व्यक्ती आणि समुदायांचा गौरव करण्यात आला.

देशभरातील रायडर्स, समुदाय नेते आणि मान्यवर पाहुण्यांच्या उपस्थितीत आयोजित हा सोहळा रायडर-नेतृत्वातील आणि तळागाळातील योगदानकर्त्यांसाठी समर्पित भारतातील पहिल्या मोठ्या सन्मान मंचांपैकी एक ठरला.

अभिनेता आणि सूत्रसंचालक अमन यतन वर्मा यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. कथाकथन आणि उत्सव यांचा सुंदर संगम साधत, प्रसिद्धीपासून दूर राहून सातत्याने योगदान



देणाऱ्या रायडर्सचा येथे गौरव करण्यात आला. विंगमॅनएक्सचे संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी निलेश साने यांनी या उपक्रमामागील दृष्टीकोन स्पष्ट करताना सांगितले, "रायडर्सना अर्थपूर्ण पद्धतीने एकत्र जोडणे आणि जबाबदारीने रायड करण्यासाठी प्रेरित करणे, या उद्देशाने हे व्यासपीठ उभारण्यात आले. विश्वासावर आधारित योग्य रायडिंग साथीदार शोधण्याच्या साध्या कल्पनेतून सुरू झालेला हा प्रवास आज राष्ट्रीय स्तरावरील रायडर इकोसिस्टम बनला आहे, जिथे ओळख, विश्वास आणि प्रतिष्ठेला महत्त्व आहे. हे पुरस्कार सातत्याने उच्च मानके प्रस्थापित करणाऱ्या रायडर्स आणि समुदायांचा सन्मान करतात."

# छत्रपती शिवाजी महाराज यांच्यावर आधारित युवाची ए4 लॉंगबुक्स आणि मराठी 'सुविचार' पेन्सिली महाराष्ट्रभरातील दुकानांत उपलब्ध

**नवी दिल्ली : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्रभरात साजऱ्या होणाऱ्या शिवजयंतीच्या पार्श्वभूमीवर स्टेशनरी ब्रँड 'युवा' तर्फे छत्रपती शिवाजी महाराजांवर आधारित शालेय साहित्याची विशेष मालिका सादर करण्यात आली आहे. सतराव्या शतकातील मराठा राज्यकर्ते छत्रपती शिवाजी महाराजांचे स्थान महाराष्ट्राच्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक स्मृतीत अत्यंत महत्त्वाचे असून, या उत्पादनांच्या माध्यमातून परिचित ऐतिहासिक संदर्भ थेट विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवता येतात. शाळांमधील विविध वयोगटांच्या गरजा लक्षात घेऊन ही श्रेणी साकारण्यात आली आहे. मोठ्या आकाराची ए4 लॉंगबुक्स माध्यमिक आणि उच्च माध्यमिक स्तरांवरील विद्यार्थ्यांसाठी



उपयुक्त ठरतात, तर पेन्सिली सर्वच वयोगटांतील विद्यार्थ्यांच्या वापरासाठी अनुकूल आहेत. या सर्व ए4 लॉंगबुक्सवर छत्रपती शिवाजी महाराजांशी संबंधित प्रसंग आणि प्रतीकांचे चित्रात्मक सादरीकरण करण्यात आले आहे. तसेच या पेन्सिलींवर छोटे मराठी सुविचारही देण्यात आले आहेत, ज्यात छत्रपती शिवाजी महाराजांच्या गुणांचे वर्णन करणारे सुविचारही समाविष्ट आहेत. दैनंदिन शालेय साहित्यामध्ये प्रादेशिक आणि सांस्कृतिक संदर्भ समाविष्ट करण्याचा वाढता ट्रेंड या उपक्रमातून दिसून येतो. समाज माध्यमांचा प्रभाव अधिकाधिक जागतिक स्वरूपाचा होत असताना, विद्यार्थ्यांच्या रोजच्या आयुष्यात सांस्कृतिक ओळख जपली जावी, यासाठी शिक्षक आणि पालकांकडून अशा उपक्रमांकडे गांभीर्याने पाहिले जात आहे. युवा स्टेशनरीचे चीफ स्ट्रॅटजी ऑफिसर अभिजीत सान्याल म्हणाले की, आधुनिक विचारसरणी आणि सांस्कृतिक संदर्भ यांचा संगम साधण्याचा हा प्रयत्न आहे. "विद्यार्थी दररोज या वस्तूंचा वापर करतात. त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांसारख्या नेतृत्वाशी जोडलेल्या शिस्त, धैर्य यांसारख्या गुणांची त्यांना सतत आठवण करून देण्याचे काम या वस्तू करू शकतात.

# 'जगद्धात्री' मालिकेत 'हर जनम' रोमॅंटिक गाण्याची चर्चा

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

झी टीव्हीवरील लोकप्रिय मालिका 'जगद्धात्री' ला प्रेक्षकांकडून मोठ्या प्रमाणात प्रेम आणि कौतुक मिळत आहे. रोमहर्षक कथानक, भावनिक खोली आणि दमदार अभिनयामुळे ही मालिका प्रेक्षकांच्या मनाला भिडली आहे. त्यामुळेच 'जगद्धात्री' ही सध्या सर्वाधिक चर्चेत असलेल्या मालिकांपैकी एक ठरली आहे. या मालिकेतील अनेक ठळक पैलूंमध्ये शिवाय (फर्मान हैदर) आणि जगद्धात्री (सोनाक्षी बत्रा) यांची केमिस्ट्री विशेष चमकते. त्यांच्या ऑन-स्क्रीन नात्याने प्रेक्षकांची मने जिंकली असून # शिवधात्री ही जोडी चाहत्यांची आवडती प्रेमकहाणी ठरली आहे.

# केरळ टुरिझमच्या लेन्स्केप केरळ या भव्य छायाचित्र प्रदर्शनाची सुरुवात

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

'गॉड्स ओन कंट्री' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या केरळच्या विविधरंगी आकर्षणांचे दर्शन घडवणाऱ्या दुर्मिळ छायाचित्रसंग्रहाचे पुढील तीन दिवस शहरात प्रदर्शन होणार आहे. केरळ टुरिझमतर्फे आयोजित अखिल भारतीय 'लेन्स्केप केरळ' या विशेष छायाचित्र प्रदर्शनाचे उद्घाटन आज राजा रवि वर्मा आर्ट गॅलरी येथे करण्यात आले. या प्रदर्शनाचे उद्घाटन अभिनेत्री राजश्री देशपांडे आणि चित्रपट दिग्दर्शक मंगेश जोशी यांच्या हस्ते झाले. देशातील १० नामवंत ट्रॅव्हल आणि मीडिया छायाचित्रकारांनी केरळमध्ये टिपलेल्या १०० निवडक छायाचित्रांचा यात समावेश आहे.

या प्रदर्शनाचे क्युरेशन प्रख्यात कला समीक्षक व क्युरेटर उमा नायर यांनी केले आहे.



ख्यातनाम वन्यजीव आणि संवर्धन छायाचित्रकार बालन माधवन हे 'डायरेक्टर ऑफ फोटोग्राफी' आहेत. उद्घाटनानंतर उमा नायर यांनी बालन माधवन आणि सहभागी छायाचित्रकार सौरभ चॅटर्जी यांच्यासह प्रदर्शनाची विशेष फेरी घेतली. केरळला केवळ पर्यटनस्थळ म्हणून न दाखवता, या प्रदर्शनातून राज्याचे निसर्गसौंदर्य, सांस्कृतिक वैविध्य आणि स्मरणरंजनात्मक पैलू जिवंत छायाचित्रांतून उलगडले आहेत.

हे प्रदर्शन २० फेब्रुवारीपर्यंत सकाळी ११ ते सायंकाळी ७ या वेळेत सर्वांसाठी खुले राहणार आहे. ऑनलाइन संदेशात केरळचे पर्यटन मंत्री पीए महंमद रियाझ म्हणाले, या महान शहरात—जे सांस्कृतिक आणि आर्थिकदृष्ट्या देशातील एक महत्त्वाचे केंद्र आहे—केरळच्या उबदारपणा आणि चैतन्याचा अनुभव देणारे हे व्यासपीठ आणताना आम्हाला आनंद होत आहे." ते पुढे म्हणाले, लेन्स्केप केरळ राज्याच्या सांस्कृतिक विविधतेचा आणि बहुविधतेचा उत्सव साजरा करते. २०२५ मध्ये केरळ पर्यटनाने २.५८ कोटींपेक्षा अधिक पर्यटकांची नोंद करत विक्रमी वाढ साधली आहे. अशा नाविन्यपूर्ण आणि अनुभवाधारित उपक्रमांमुळे केरळ पर्यटनाच्या वाढीस गती मिळाली आहे." "केरळला जागतिक स्तरावर मान्यता प्राप्त पर्यटनस्थळ म्हणून अधोरेखित करण्याबरोबरच हे प्रदर्शन प्रवाशांना जंगल, डोंगर, बॅकवॉटर, उपासनेची स्थळे आणि उत्सव यांसारख्या 'लाइव्ह अनुभवां'ची ओळख करून देणारे दिशादर्शक ठरते," असेही त्यांनी नमूद केले.

# मॉरिशसमध्ये होणार मराठी अस्मितेचा जागतिक जयघोष

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

जगभरातील मराठी भाषिकांकडून दरवर्षी मराठी भाषा दिन अभिमानाने साजरा केला जातो. केंद्र सरकारकडून मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर हा अभिमान अधिकच वृद्धिंगत झाला आहे. या ऐतिहासिक गौरवाचा विस्तार आंतरराष्ट्रीय स्तरावर करण्याच्या उद्देशाने मॉरिशस येथे २७ फेब्रुवारी ते ३ मार्च २०२६ या कालावधीत "मोगरा फुलला" या भव्य आंतरराष्ट्रीय सांगीतिक व सांस्कृतिक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

हा कार्यक्रम मॉरिशसमधील प्रतिष्ठित सर्ज कॉन्स्टँटिन थिएटर येथे पार पडणार असून, याबाबतची माहिती स्वान रिसर्च अँड सोशल स्टडी फाउंडेशन चे अध्यक्ष शशिकांत कांबळे यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी प्रबोधन परिवाराच्या सन्मिता धापटे-शिंदे, पंकज सातव, फाउंडेशनचे सचिव



प्रसादराजे भोपळे आदि मान्यवर उपस्थित होते. हा सोहळा स्वान रिसर्च अँड सोशल स्टडी फाउंडेशन आणि प्रबोधन परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने, महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक मंत्रालय व मॉरिशस कला व सांस्कृतिक मंत्रालय यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात येत आहे. यासोबतच मॉरिशस मराठी कल्चरल सेंटर ट्रस्ट, मॉरिशस मराठी मंडळी फेडरेशन, मॉरिशस मराठी स्पीकिंग युनियन आणि क्रॉसवेज इंटरनॅशनल यांचे सक्रिय सहकार्य लाभले आहे.

यंदाचे वर्ष संतपरंपरेचे अध्वर्यू संत ज्ञानेश्वर यांच्या ७५० व्या जयंती वर्षाचे आहे. त्या औचित्याने हा संपूर्ण सोहळा त्यांच्या जीवनकार्य, तत्त्वज्ञान आणि मानवतावादी विचारांवर आधारित आहे. मराठी भाषा, अध्यात्म आणि संस्कृती यांचा संगम साधणारा हा उपक्रम जागतिक मराठी उत्सव म्हणून साकारत आहे. "मोगरा फुलला" हा कार्यक्रम गणेश शिंदे आणि सन्मिता धापटे-शिंदे तर शुभांगी शिंदे 'मी महाराष्ट्र बोलतोय' यावर स्वगत सादर करणार आहेत. असे कांबळे यांनी सांगितले.

या कार्यक्रमाला मॉरिशस प्रजासत्ताकाचे उपराष्ट्रपती जीन रॉबर्ट इवान हंगली, कला व सांस्कृतिक कार्य मंत्री महेंद्र गोंदिया तसेच महाराष्ट्राचे सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. मॉरिशसमध्ये वास्तव्यास असलेल्या मोठ्या मराठी डायस्पोरा समुदायाला मातृभूमीतील आध्यात्मिक, साहित्यिक व सांस्कृतिक वारशाशी पुन्हा जोडणारे प्रभावी व्यासपीठ म्हणून "मोगरा फुलला" कडे पाहिले जात आहे.

Qualcomm ventures

# क्वालकॉमकडून गुंतवणुकीची घोषणा

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

क्वालकॉम इन्कॉर्पोरेटेडने आज भारतातील वेगाने वाढणाऱ्या तंत्रज्ञान आणि एआय स्टार्टअप इकोसिस्टमला पाठिंबा देण्यासाठी 150 दशलक्ष डॉलर्सपर्यंत गुंतवणूक करण्याचा निर्णय जाहीर केला. ही गुंतवणूक क्वालकॉम व्हेंचर्समार्फत केली जाणार असून सर्व स्तरांवरील स्टार्टअप्समध्ये गुंतवणूक केली जाईल. विशेष लक्ष एआयच्या ऑटोमोटिव्ह, आयओटी, रोबोटिक्स आणि मोबाईल क्षेत्रांवर असेल. ही पुढाकार क्वालकॉमच्या भारतातील तंत्रज्ञान क्षेत्रातील दीर्घकालीन बांधिलकीचे प्रतीक आहे आणि जागतिक स्तरावर edge AI पुढे नेण्याच्या नेतृत्वाशी सुसंगत आहे.

# 'फर्स्ट टेक चॅलेंज इंडिया २०२५-२६' चा समारोप

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

भारताने विद्यार्थी रोबोटिक्स आणि एसटीईएम नवोन्मेषात एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. नुकतेच विश्वकर्मा विद्यापीठाने सादर केलेल्या एसजीटी युनिव्हर्सिटी, गुरुग्राम येथे आयोजित भव्य राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेने 'फर्स्ट टेक चॅलेंज इंडिया २०२५-२६' चा समारोप झाला. या स्पर्धेत भारतातील आंतरराष्ट्रीय सहभागींसह शीर्ष रोबोटिक्स संघांना एकत्र आणले, ज्यांनी अभियांत्रिकी उत्कृष्टता, नवोन्मेष आणि सहयोगी समस्या सोडवण्याचे प्रदर्शन एका राष्ट्रीय व्यासपीठावर केले. या राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेचे औपचारिक उद्घाटन भारत सरकारचे प्रधान वैज्ञानिक सल्लागार प्रो. अजय कुमार सूद, एसजीटी युनिव्हर्सिटीचे कुलगुरू डॉ. हेमंत वर्मा, सायबर मीडिया ग्रुपचे अध्यक्ष प्रदीप गुप्ता, संत ईश्वर फाउंडेशनच्या



भारती खन्ना, इन्फिनिटी एक्स स्टेम फाउंडेशनचे अध्यक्ष अश्विन बी. सावंत व फर्स्ट टेक चॅलेंज इंडिया प्रोग्रामचे डिलिव्हरी पार्टनर इन्फिनिटी एक्सचे संचालक मोहम्मद अतेक मोहिउद्दिंग सिद्दकी आदी मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले.

फर्स्ट (विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रेरणा आणि ओळखीसाठी) ही एक जागतिक ना-नफा तत्वावर चालणारी संस्था आहे, जी तरुणांना अभियांत्रिकी, नवोन्मेष आणि नेतृत्व कौशल्ये निर्माण करणाऱ्या मार्गदर्शक-आधारित कार्यक्रमांद्वारे विज्ञान आणि तंत्रज्ञानाचे नेते बनण्यास प्रेरित करण्यासाठी समर्पित आहे. फर्स्ट टेक चॅलेंज (एफटीसी) हा १२ ते १८ वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी एक प्रमुख जागतिक रोबोटिक्स कार्यक्रम आहे, जिथे संघ औद्योगिक-शैलीतील रोबोट डिझाइन, बांधणी आणि प्रोग्राम करतात आणि संरचित स्पर्धा स्वरूपात स्पर्धा करतात, जे नवोन्मेष, टीमवर्क आणि दयाळू व्यावसायिकतेला प्रोत्साहन देते.

# निसानकडून INR 5.65 Lakhs प्रारंभी

**नवी दिल्ली : (समर्थ गांवकरी)**

निसान मोटर इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (एनएमआयपीएल) ने आज न्यू निसान ग्रॅव्हाइटची घोषणा केली. त्याची किंमत सुमारे INR 5.65 लाख रुपये आहे. एक धाडसी आणि गेम-चेंजिंग ७-सीटर एमपीव्ही, ग्रॅव्हाइट निसानच्या भारतातील प्रवासात एका नवीन अध्यायाची सुरुवात करते.

मेड इन इंडिया, मेड फॉर इंडियाने प्रेरित होऊन, ग्रॅव्हाइट हे निसान मोटर इंडियाच्या नवीन उत्पादन मोहिमेअंतर्गत बाजारात आणले जाणारे पहिले उत्पादन आहे - जे कंपनीची भारतातील मजबूत वचनबद्धता आणि उपस्थिती अधोरेखित करते.

"ग्रॅव्हाइट" हे नाव १.४ अब्ज भारतीय आणि देशाच्या विविधतेला आकार देणाऱ्या १९,००० स्थानिक भाषा आणि




परंपरांनी प्रेरित आहे. ग्रॅव्हाइट हे भारतीय कुटुंबांच्या वाढत्या आकांक्षा पूर्ण करण्यासाठी उद्देशाने तयार केले गेले आहे. हे गाडीचे स्थान, वैविध्यपूर्ण प्रतिभा, आराम आणि दैनंदिन व्यावहारिकतेसह रस्त्यावरील उपस्थिती दर्शवते. मध्य पूर्व, केएसए, सीआयएस आणि भारत - निसान आणि इन्फिनिटीचे विभागीय उपाध्यक्ष आणि अध्यक्ष थियरी सब्बाग म्हणाले, "निसानच्या जागतिक महत्त्वाकांक्षांमध्ये भारत केंद्रस्थानी आहे.

# 'सायको सैयां'मध्ये रवी किशन, तेजस्वी प्रकाश आणि अनुद सिंग ढाका प्रमुख भूमिकेत

**नवी दिल्ली : (समर्थ गांवकरी)**

भारतातील आघाडीची विनामूल्य, प्रीमियम, अ‍ॅड-सपोर्टेड व्हिडिओ स्ट्रीमिंग सेवा देणाऱ्या अ‍ॅमेझॉन एमएक्स प्लेयरने आज आपल्या आगामी रोमान्स-थ्रीलर सायको सैयां'च्या अधिकृत ट्रेलरची घोषणा केली आहे. ही कथा आपल्या नेहमीच्या प्रेमकथेसारखीच आहे, एका व्यापक, फिल्मीस्टाइल प्रेमकथेसारखी सुरू होत हळूहळू हृदयाचे ठोके वाढवते. या कथेत प्रेमातला आवेग आणि वेडेपणा दिसू लागतो आणि मग हे सगळे असह्य होते. रवी किशन, तेजस्वी प्रकाश आणि अनुद सिंग ढाका यांच्या प्रमुख भूमिका असलेल्या या सिरिजमध्ये सृष्टी श्रीवास्तव, सुरभी चंदना, वरुण भगत, अश्विनी कलसेकर आणि यशपाल शर्मा यांच्याही मुख्य भूमिका आहेत.




या ट्रेलरमध्ये कार्तिक शायरीची आवड असलेल्या उज्जैनमध्ये राहणाऱ्या तरुणाची ओळख समोर येते, ज्याला वाटत असते की, त्याचे विश्व पूर्ण करणारी मुलगी त्याला सापडली आहे – चारू. त्याच्यासाठी, प्रेम म्हणजे निव्वळ टाइमपास नसून ते महाकाव्यासारखे परिपूर्ण आणि कोणतीही जोखीम घेण्याची तयारी असलेले असते. पण प्रत्येक तीव्रतेची किंमत मोजावी लागते. कार्तिकच्या भावना जसजशा खोल होत जातात, तसतसे प्रेमाला धरून ठेवण्याची गरजही वाढत जाते. तो शहरांमध्ये तिचा पाठलाग करतो, सगळ्या अधिकारांच्या विरोधात जातो आणि त्याच्या मार्गात अडथळा आणणाऱ्या कोणालाही आव्हान देतो. तो ज्याला प्रेम म्हणतो ते आता धोकादायक आणि मालकी हक्क गाजवणारे वाटू लागते.

उज्जैन, कटनी आणि जॉर्जियाच्या पार्श्वभूमीवरील या कलाकृतीच्या ट्रेलरमध्ये तीव्र संघर्ष, वाढती गुन्हेगारी शक्ती, भावनिक हेरगिरी आणि अधिकाधिक नाजूक वाटणाऱ्या नातेसंबंधांची झलक दाखवण्यात आली आहे. रवी किशन प्रत्येक वळणावर शक्तीचे संतुलन बदलणाऱ्या उपस्थितीसह ठाशीव भूमिकेत अंकुश ठेवतो. ज्यामुळे कथा अधिक मजबूत आणि धोकादायक वाटते. ट्रेलर संपल्यानंतर बराच काळ प्रश्न कायम राहतो- प्रेम सीमारेषा ओलांडून कधी पुढे जाते?

अ‍ॅमेझॉन एमएक्स प्लेयरचे हेड ऑफ कंटेंट अमोघ दुसाद म्हणाले, "अ‍ॅमेझॉन एमएक्स प्लेयरमध्ये केवळ आकर्षकच नव्हे तर भावनांचे एक अद्वितीय मिश्रण असलेल्या कथा आणण्याचा आमचा सतत प्रयत्न आहे. सायको सैयां'ची सुरुवात प्रेक्षकांना आवडणाऱ्या आकर्षक क्लासिक रोमान्सने होते. परंतु ही कथा थोड्याच अवधीत झटपट एका सखोल, मानसिक कथनात बदलून जाते. देशभरातील व्यापक आणि वैविध्यपूर्ण प्रेक्षकांना आकर्षित करणाऱ्या लक्षवेधी, भावनिकदृष्ट्या आकर्षक कथा सादर करण्याच्या आमच्या व्यापक दृष्टीकोनात ही सिरीज बसते."

आपल्या ओटीटीवरील पदार्पणाबद्दल तेजस्वी प्रकाश म्हणाली, "सायको सैयां हे माझे अभिनय करकीर्दीतील ओटीटी पदार्पण असून यात साकारलेल्या बहूपदरी पात्रासाठी मी आभारी आहे. चारू सुरुवातीला विश्वास आणि आरामात असते; परंतु तिचे जग बदलत राहते. त्या बदलाला ती कशाप्रकारे प्रतिसाद देते, शंका, भीती आणि काहीशा चुकीची वाढती जाणीव तिच्या प्रवासाला आकर्षक बनवते. जसजसा धोका वाढतो, तसतशी कधीही कल्पना न केलेल्या वास्तवाचा सामना करण्यास भाग पाडले जाते." सुप्रसिद्ध अभिनेता रवी किशन पुढे म्हणाला, "सायको सैयां ही केवळ एक रोमान्टीक कथा नसून शक्तीचा वापर, नियंत्रण आणि अनियंत्रित भावनांच्या परिणामांबद्दल देखील आहे. माझ्या पात्रात प्रभावाची शक्ती आहे आणि त्याला त्यात आनंद मिळतो. तो त्याच्या स्वतःच्या नियमांनुसार खेळतो आणि त्या व्यक्तिरेखेसोबत एक विशिष्ट अनिश्चितता आणतो. ही एक अशी भूमिका आहे ज्याने मला तीव्र, बिनशर्त होण्याची आणि त्यानंतरच्या गोंधळात खूप मजा करण्याची संधी दिली"

# सत्ता असो वा नसो सर्वसामान्य जनतेच्या हितासाठी कार्यरत

## सत्तेत येण्याचे खासदार नीलेश लंके यांचे संकेत

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

सत्ता असो वा नसो आपण आजपर्यंत सर्वसामान्य जनतेच्या हिताचे निर्णय घेण्यासाठी कार्यरत राहीलो असून लवकरच सत्तेत येऊन विरोधकांना आऊट करण्याचा ईशारा खासदार नीलेश लंके यांनी निघोज येथील विविध विकासकामांचे भूमिपूजन व उद्‌घाटन कार्यक्रमात दिला आहे. निघोज येथील लाळगे मळा, तनपुरे वस्ती,काळे वस्ती,लामखडे वरखडे वस्ती, शिवडी परिसर तसेच शिरसुले येथील जवळपास पाच कोटी रुपयांच्या कामांचे भूमिपूजन व उद्‌घाटन खासदार लंके यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी ते बोलत होते. यावेळी बाजार समितीचे सभापती किसनराव रासकर, माजी पंचायत समिती सदस्य डॉ.भास्करराव शिरोळे, मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे अध्यक्ष वसंत कवाद सर, उपाध्यक्ष अमृताशेठ रसाळ,

माजी सरपंच ठकारामशेठ लंके, मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे सहसचिव विश्वासराव शेटे, विश्वस्त ज्ञानेश्वर उर्फ बाळासाहेब लंके, माजी विश्वस्त शिवाजीराव वराळ, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका कार्याध्यक्ष सोमनाथ वरखडे, उद्योजक मंगेश लंके, ग्रामपंचायत सदस्य दिगंबर लाळगे, शंकर गुंड, नारायण घोगरे, गणेश कवाद, दिगंबर घोगरे, शिवाजीराव डेरे, किसनराव घोगरे, युवा नेते विशाल डेरे, दत्तात्रय घोगरे, सुनिल वराळ, पोपटराव कळमोडे, गोविंद लामखडे, भिवाशेठ गुंड, सचिन लंके , लोकनेते निलेश लंके प्रतिष्ठानचे



प्रसिद्धी प्रमुख विकास शेटे , युवा नेते अनिल लामखडे आदी तसेच परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. खासदार लंके यावेळी म्हणाले निघोज आणी परिसरात गेली चार ते पाच वर्षात तीस कोटी रुपयांची विकासकामे केली असून निघोजकरांनी प्रत्येक निवडणुकीत आपल्यावर मनापासून प्रेम केले असून यापुढे सुध्दा हेच प्रेम निघोजकरांचे आपल्यावर राहाणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या भागातील विजेचा,आरोग्याचा, जलसिंचन योजना असो किंवा शाळांची विकासकामे असोत जनतेच्या मुलभूत गरजा व सुविधा उपलब्ध करण्यासाठी आपण सदैव कार्यरत असून मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट विकासासाठी जगप्रसिद्ध रांजणखळगे विकासासाठी निधी अभ्यासिका ईमारत, कार्यालयीन सुविधा, वाचनालय यासाठी जसा निधी उपलब्ध केला व कामे पुर्णत्वास केली आहेत तशाप्रकारे देवी वर्गणीसाठी सुसज्ज सभागृह आपण मंदीरासमोर देणार असून याबाबतची जागा उपलब्ध आणी प्रस्ताव संबंधित पदाधिकाऱ्यांनी देण्याची सुचना खासदार लंके यांनी केली आहे. राज्यातील किल्याच्या संवर्धनासाठी आपण एक वर्षापूर्वी मोहीम हाती घेतली होती. हा वर्षपुर्तीचा शिवसोहळा कार्यक्रम लवकरच रायगडावर पंतप्रधान नरेंद्र मोदी व राष्ट्रवादीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा माजी केंद्रीय मंत्री शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत घेणार आहोत. तसेच दि.८ मार्च ते दि.११ मार्च दरम्यान महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात येणार असून प्रत्येक आजारावरील निदान व तपासणी मोफत असणार आहे. डॉ. शिरोळे व माजी सरपंच ठकारामशेठ लंके यांनी या भागात मोतीबिंदू शिबीराचे आयोजन करुण जनतेच्या आरोग्य समस्यावर लोकप्रबोधनपर शिबीरांचे आयोजन करण्याची सुचना त्यांनी यावेळी केली. माजी पंचायत समिती सदस्य डॉ.भास्करराव शिरोळे यावेळी म्हणाले विधानसभा आणी लोकसभा या माध्यमातून खासदार नीलेश लंके यांनी मोठ्या प्रमाणात विकासकामे केली आहेत. परिसरात आल्यानंतर पाच ते सहा कोटीचे भुमिपुजन व उद्‌घाटन करुण अतिशय कार्यक्षमपणे काम करणारे लोकप्रतिनिधी म्हणून त्यांचा राज्यात नावलौकिक असून पवार साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली काम करणारे नेतृत्व म्हणून ते देशात परिचीत असून देशाचे नेते शरदचंद्रजी पवार साहेब यांचे हात बळकट करण्यासाठी आगामी जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणूकीत जनतेने पवार साहेब यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहण्याचे आवाहन डॉ. शिरोळे यांनी केले आहे. माजी सरपंच ठकारामशेठ लंके यांनी सांगितले की आमदार व खासदार म्हणून काम करताना तालुका विकासासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी खासदार नीलेश लंके यांनी दिला आहे. गेली पाच पन्नास वर्षात झाली नाहीत त्यापेक्षा अधिक पटींनी विकासकामे गेली सहा वर्षात झाली आहेत. जी कामे खासदार लंके यांनी आणली आहेत त्याच कामांची भुमिपुजने व उद्‌घाटन विरोधक करीत आहेत. मात्र जनता चाणाक्ष आहे. तुम्ही कितीही नारळ फोडली तरी त्या विकासकामांचा धनी मात्र खासदार लंके साहेब आहेत हे जनतेला माहीत असल्याने आगामी निवडणुकीत जनता तुम्हाला तुमची जागा दाखवून देईल असा इशारा माजी सरपंच लंके यांनी विरोधकांना आपल्या भाषणातून दिला आहे. या वेळी लाळगे मळा आणी शिरसुले येथे झालेल्या जाहीर कार्यक्रमात अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी प्रास्ताविक भाषनांत विकासकामांचा आढावा घेत विजेची सध्या चोवीस तास गरज असून यासाठी खासदार लंके यांनी प्रयत्न करण्याची मागणी केली. युवा नेते विशाल डेरे व ग्रामपंचायत सदस्य दिगंबर लाळगे यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

## बनावट कुल्फीच्या कारखान्याचा पोलिसांकडून पर्दाफाश

**इगतपुरी : (समर्थ गांवकरी)**

इगतपुरीत बनावट कुल्फी बनविणाऱ्या कारखान्याचा इगतपुरी पोलीसांनी पर्दाफाश केला आहे. इगतपुरी पोलीसांना गुप्त बातमीदारांमार्फत गुप्त बातमी मिळाली होती की, इगतपुरी येथील चर्चहील परिसरात केमिकलयुक्त पदार्थापासुन कुल्फी बनविणे सुरु आहे. याबाबत पोलीसांनी व अन्न औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांसह या ठिकाणी धाड टाकली. या कारवाईत पंधरा गोविंद कलर पोस्टरच्या बाटल्या, चॉकलेट प्लेवरच्या तीन बाटल्या व इसेन्स असा कुल्फी बनविण्यासाठी वापर होत असल्याचे प्रथम दर्शनी समोर आले आहे. यावेळी कारखान्यात असलेले सर्व नमुने गोळा करुन ते तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविण्यात आले आहे. त्याचा अहवाल आल्यानंतर पुढील कारवाई करण्यात येणार



आहे. बनावट मिळुन आलेल्या २५०० कुल्फ्यांची निर्जनस्थळी विल्हेवाट लावण्यात आली आहे. विनोद प्रकाश कुशवाह रा. इगतपुरी यांचेकडे कुल्फी बनविण्यासाठीचा कुठल्याही प्रकारचा परवाना व शॉप ॲक्ट परवानाही आढळुन आला नाही. त्यामुळे अन्न व औषध विभाग यांनी जिवीतास धोकादायक असे संशयित पदार्थाचे नमुने सिल करुन तपासणीसाठी पाठविले आहेत. तो पर्यंत कारखाना बंद ठेवण्याची नोटीस संशयित इसमाला देण्यास आली आहे. ही धडक कारवाई इगतपुरी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सारिका अहिरराव, पोलीस हवालदार निलेश देवराज, विजय रुद्रे, महेंद्र गवळी यांनी केली आहे. पुढील तपास इगतपुरी पोलीस स्टेशनच्या प्रभारी अधिकारी श्सारिका आहिरराव व अन्न सुरक्षा विभाग नाशिकचे अधिकारी एस. जे. मंडलीक, अमित रासकर, किशोर चांदगुडे हे करीत आहेत.

## अजितदादांचे AI व्हिडिओ बनवणाऱ्यांवर कारवाई होणार

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

राष्ट्रवादी काँग्रेसचे दिवंगत नेते अजित पवार यांच्या निधनानंतर दोन्ही गटांतील राजकीय तणाव कमालीचा वाढला असून, शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी अजित दादांचे विमान मुद्दाम पाडले, असा खळबळजनक आरोप करत थेट व्हीएसआर कंपनीवर संशय व्यक्त केला आहे. रोहित पवारांनी अजित पवारांचे एआय व्हिडिओ बनवणाऱ्या तरुणांचे कौतुक करत काही नेत्यांवर अप्रत्यक्ष निशाणा साधला असतानाच, आता राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी अजित पवारांच्या आवाजातील एआय व्हिडिओ बनवणाऱ्यांना थेट इशारा देत अप्रत्यक्षपणे रोहित पवारांवर निशाणा साधला आहे.

## जामखेड तालुक्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा

- जामखेड महाविद्यालया च्या वतीने प्रसिद्ध निवेदक श्री आनंदराव देशमुख यांचा "वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्ड "पुरस्काराबद्दल सत्कार.

**जामखेड तालुका : (समर्थ गांवकरी)**

आज दिनांक १७/०२/ २०२६ रोजी जामखेड महाविद्यालय, जामखेड येथे प्रसिद्ध आकाशवाणी निवेदक मा .श्री आनंद देशमुख सौ. कुंदाताई देशमुख यांचा महाविद्यालयाचे वतीने सपत्नीक सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रस्ताविक व पाहुण्यांचा परिचय प्राचार्य डॉ. सुनील पुराणे यांनी केले. जामखेड सारख्या दुष्काळी दुर्गम भागात जन्मलेले आनंद देशमुख यांना ब्रिटिश पार्लमेंटचा "वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्डस" लंडन हा



पुरस्कार प्राप्त झाला आहे. या पुरस्कारांने जामखेडकरांच्या 'शिरपेचात मानाचा आणखी एक तुरा खोवण्याचे काम केले आहे. त्यांना भारतातील सवाई गंधर्व भीमसेन महोत्सवातील सलग 33 वर्ष निवेदनाबाबत ब्रिटिश पार्लमेंटने पुरस्कृत केलेला पहिला पुरस्कार प्राप्त झाला आहे. महाराष्ट्र साहित्य परिषदेने देखील त्यांना "जिंदादिल "पुरस्कार प्रदान केला आहे.त्याचबरोबर अनेक पुरस्कारांनी ते सन्मानित आहेत. 33 वर्ष सवाई गंधर्व भीमसेन महोत्सवात निवेदक व पुरस्कार प्राप्त झाल्यानंतरचा 33 वा सत्कार त्यांचा ते ज्या संस्थेत शिकले त्या संस्थेच्या महाविद्यालयात होणे हा योगायोग आज जुळून आला. महाविद्यालयासाठी हा अतिशय अभिमानाचा क्षण असून एवढ्या मोठ्या कर्तृत्ववान व्यक्तीचा सन्मान करण्याची संधी माजी सचिव श्री शशिकांत देशमुख यांच्या माध्यमातून महाविद्यालयाला प्राप्त झाली याचा खूप आनंद वाटत असल्याचे प्राचार्य डॉ. पुराणे यांनी म्हटले. ते आकाशवाणी मध्ये २४ वर्ष निवेदक तथा कार्यक्रम अधिकारी म्हणून कार्यरत होते. गेली ५७ वर्षे ते निवेदक म्हणून कार्यरत आहेत आणि त्यांच्या अर्धांगिनी सौ. कुंदाताई यांनी प्रत्येक कार्यक्रमाच्या बारीक-सारीक नोंदी ठेवल्या आहेत आणि सध्या त्या त्यांच्या प्रत्येक कार्यक्रमाच्या नियोजनाची धुरा सांभाळतात. याप्रसंगी कुंदाताई यांनी श्री. आनंदजी यांचा जीवनपट उलघडणारे आत्मचरित्र लिहिण्याचा संकल्प केला.

## डोंबिवलीत बनावट औषधांचे मोठे रॅकेट उघड; रुग्णांच्या जीवाशी खेळ

- बिहार कनेक्शन समोर
- डोंबिवलीत बनावट औषधांचे मोठे रॅकेट उघड; रुग्णांच्या जीवाशी खेळ!
- डोंबिवलीतील 'श्री राम फार्मा' चा मालक पंकज उपाध्याय आणि मुंबईतील वितरक बिवेक अजयकुमार राय, अशा दोघांना अटक.
- बनावट औषधांचा साठा बिहार राज्यातून आल्याचं समोर

**ठाणे:कल्याण : (समर्थ गांवकरी)**

नामांकित कंपनीच्या नावे बनावट औषधांची विक्री करणाऱ्यांचे मोठे रॅकेट डोंबिवलीत उघडकीस आलं आहे. पोलिसांनी बनावट औषधांचा साठा जप्त केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार,



उच्च रक्तदाबासाठी वापरल्या जाणाऱ्या 'Telma AM' या नामांकित औषधांच्या बनावट गोळ्यांची विक्री करण्यात येत होती. विशेष बाब म्हणजे हा बनावट औषधांचा साठा बिहार राज्यातून आल्याचं समोर आलं आहे. त्यामुळं याप्रकरणी बिहार कनेक्शन असल्याचं म्हटलं जात आहे. दरम्यान, बनावट बिलांच्या आधारे रॅकेट चालवल्याचा पोलिसांच्या तपासात आढळून आले. त्यानंतर बनावट औषधांचे धागेदोरे अनेक राज्यांत असल्याचा संशय व्यक्त करत मुख्य उत्पादकाचा शोध घेण्यासाठी पोलीस पथके रवाना झाली आहेत, अशी माहिती एसीपी सुहास हेमाडे यांनी दिली आहे.

यात्प्रकरणी दोघांना अटक : याप्रकरणी मानपाडा पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम १२३, ३१८(४), ३३६(३), ३४०(२), २७७, २७८, ३(५) सह औषध व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० व नियम १९४५ कलम १८ (a) (i), सहवाचन १७(b) सह शिक्षा कलम २७(b), २७(c) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून दोघांना अटक केली आहे. यामध्ये डोंबिवलीतील 'श्री राम फार्मा' चा मालक पंकज उपाध्याय आणि मुंबईतील वितरक बिवेक अजयकुमार राय, अशा दोघांना अटक करण्यात आली आहे. तर या गुन्हातील इतर आरोपींचा पोलीस पथक शोध घेत असल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली आहे.

८ लाख ९४ हजार ४०० रुपयांचा साठा जप्त : पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पोलीस कोठडीत असलेला आरोपी पंकज राधेश्याम उपाध्याय हा Telma AM Tablets (Telmisartan 40mg & Amlodepin 5 mg tablet IP) हे ब्लड प्रेसरचे बनावट औषध असल्याचे व ते मानवी शरीरास अपायकारक असल्याचं तसंच सदर बनावट औषधाच्या वापरामुळं मानवी आरोग्यास धोका पोहचू शकतो, हे माहीत असताना सुद्धा सदर औषध हे मूळ उत्पादकाचे असल्यासारखं भासवून त्याचे 'श्री राम फार्मा' या औषध विकी परवान्यामार्फत विक्री करत होता. याबाबतची गुप्त माहिती मिळाल्यानंतर अन्न व औषध प्रशासन पथकानं छापा टाकून त्यांच्याकडून ८ लाख ९४ हजार ४०० रूपये किंमतीच्या Telma AM Tablets च्या एकूण २७९५ स्ट्रीप जप्त केला आहेत.

हृदयविकाराचा किंवा स्ट्रोकचा गंभीर धोका : अन्न व औषध प्रशासन अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, जप्त केलेला या बनावट गोळ्या शरीरात उशिरा विरघळतात. ज्यामुळं रुग्णांना हृदयविकाराचा किंवा स्ट्रोकचा गंभीर धोका होतो. दरम्यान, या गंभीर गुन्ह्याचा तपास डीसीपी अतुल झेंडे, एसीपी सुहास हेमाडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीपान शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली साहायक पोलीस निरीक्षक महेश राळेभात व गुन्हे प्रकटीकरण पथक करत आहे.

## आयुर्वेदिक औषधाच्या नावाखाली फसवणूक

**शिर्डी: (समर्थ गांवकरी)**

### शिर्डीत भाविकाला गंडा

शिर्डीत साईबाबांच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना विविध आमिषे दाखवून फसवण्याचे प्रकार घडतात. मात्र आता चक्क डोक्यावर केस येण्यासाठी खात्रीशीर आयुर्वेदिक औषध देण्याच्या बहाण्याने एका परप्रांतीय साईभक्ताला ११ हजार ४०० रुपयांना गंडा घातल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी शिर्डी पोलिसांनी चार जणांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. त्यामध्ये तीन महिलांचाही समावेश आहे. आंध्र प्रदेशातील अनंतपुरम जिल्ह्यातील ताडीपत्र येथील रहिवासी गिरीशकुमार थंगपुर सत्यानारायण हे शिर्डीत दर्शनासाठी आले होते. मंदिराच्या परिसरात फिरत असताना एका महिलेने त्यांना गाठले आणि त्यांच्या डोक्यावरील टक्कल पाहून आमच्याकडे केस येण्याचे खात्रीशीर आयुर्वेदिक औषध आहे, असे सांगून त्यांना विश्वासात घेतले. त्यानंतर त्यांना ताजीम खान चौकातील एका आयुर्वेदिक दुकानात नेण्यात आले. तेथे उपस्थित असलेल्या व्यक्तींनी गोड बोलून गिरीशकुमार यांना तीन औषधांच्या पुड्या दिल्या आणि औषधाचे १० हजार रुपये व एजंट कमिशन म्हणून १४०० रुपये, असे एकूण ११ हजार ४०० रुपये उकळले. काही वेळातच ही औषधे बोगस असून आपली फसवणूक झाल्याचे गिरीशकुमार यांच्या लक्षात आले. त्यांनी तातडीने पोलीस ठाणे गाठून तक्रार दिली. या तक्रारीवरून शिर्डी पोलिसांनी श्रीरामपूरमधील चौघांविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३१८ (४) आणि ३ (५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती पोलिस निरिक्षक रणजीत गलांडे यांनी दिली. शिर्डीत बऱ्याच काळापासून अशा प्रकारचे गोरखधंदे सुरू असून अनेक भाविक यापूर्वीही या जाळ्यात अडकल्याची चर्चा होत आहे. पोलीस उपविभागीय अधिकारी अमोल भारती यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक रणजीत गलांडे या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत. शिर्डीत पहिल्यांदाच अशा अफलातून पद्धतीने फसवणूक झाल्याने भाविकांमध्ये संताप व्यक्त होत असून, अशा भामट्यांचा कायमचा बंदोबस्त करण्याची मागणी जोर धरत आहे. शिर्डीमध्ये देश-विजयतील भाविक येतात विशेषत: परराज्यातील भाविकांना हेरून त्यांची मोठ्या प्रमाणात आर्थिक फसवणूक करण्याचे काम होते. हार, फुले व प्रसाद भाविकांच्या ज्यादा दराने माथी मारून त्यांची आर्थिक फसवणूक करण्यात येते. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच काही भाविक पोलिसांकडे धाव घेतात. पोलीस संबंधित दुकानदाराकडून ज्यादा आकारलेले पैसे भाविकांना मिळवून देतात.

## लुईस फिलिपकडून ‘तिकिट टू बहामास’ कलेक्शन लाँच

**बेंगळुरू : (समर्थ गांवकरी)**

आदित्य बिर्ला लाइफस्टाइल ब्रँड्स लिमिटेडच्या अंतर्गत असलेल्या प्रीमियम मेन्सवेअर ब्रँड लुईस फिलिपने स्प्रिंग-समर २०२६ साठी ‘तिकिट टू बहामास’ हे नवीन कलेक्शन लाँच केले आहे. आलिशान बीच क्लब आणि उष्णकटिबंधीय सहलींच्या अनुभवातून प्रेरित हे कलेक्शन आधुनिक पुरुषांसाठी खास डिझाइन करण्यात आले आहे. उच्च श्रेणीतील रिसॉर्ट लिव्हिंगच्या भावनेतून साकारलेल्या या कलेक्शनमध्ये रंग, पोत आणि आकार यांचे आधुनिक संयोजन पाहायला मिळते. सिट्रस टोन्स, सॉर्बेट पेस्टल्स आणि उन्हाळ्यात थंडावा देणारे सौम्य रंग यांचा वापर करून आकर्षक समर लुक साकारण्यात आला आहे. लेमन व ऑरेंज रंगांतील लिनन शर्ट्स, पेस्टल पोलो, सॉर्बेट-टोन्ड



शॉर्ट्स तसेच उष्णकटिबंधीय प्रिंट्स असलेले शर्ट्स या कलेक्शनची खासियत ठरत आहेत. हवा खेळती राहील अशा हलक्या फॅब्रिक्सचा वापर, आरामदायी सिल्हूट्स आणि आधुनिक टेलरिंग यामुळे हे कलेक्शन सौंदर्याबरोबरच आरामालाही प्राधान्य देणाऱ्या आधुनिक पुरुषांसाठी उपयुक्त ठरणार आहे.

## श्री क्षेत्र सप्तश्रृंगगड वर देवीच्या वैभवाचा नवा शिखरबिंदू!

**(समर्थ गांवकरी)**

आद्य स्वयंभू शक्तिपीठ म्हणून संपूर्ण देशभरात श्रद्धेचे केंद्रस्थान असलेल्या सप्तश्रृंगगड येथे देवीच्या वैभवात ऐतिहासिक भर पडली आहे. मंदिर सुशोभीकरण व विस्तारीकरणाच्या अंतिम टप्प्यावर असताना तब्बल सात फूट उंच आणि ५०१ किलो वजनाचा भव्य पंचधातूचा कळस गडावर दाखल झाला. या कळसामुळे मंदिराच्या शिखराला नवसंजीवनी मिळाली असून, श्रद्धा-भक्तीचा नवा तेजोमय अध्याय सुरू झाला आहे.

बुधवारी (ता. १८) श्री सप्तश्रृंग निवासिनी देवी ट्रस्ट यांच्या वतीने फुलांनी सजविलेल्या विशेष वाहनातून कळसाची भव्य सवाद्य मिरवणूक काढण्यात आली. स्थानिक नागरिकांनी सडे-रांगोळ्यांनी स्वागत केले,




तर सुवासिनींनी औक्षण करून मंगलमय वातावरण निर्माण केले.

ढोल-ताशांच्या गजरात “आई सप्तश्रृंगी माता की जय” च्या घोषणांनी गड दुमदुमून गेला. नव शिवराय बँड चे श्री. भूषण पवार व सहकाऱ्यांनी वाद्यसेवा देत सोहळ्याला ऐतिहासिक उंची दिली. भाविकांच्या जयघोष—भक्तिरसाने ओथंबलेला क्षण सर्वांनी अनुभवला.

नाशिकजवळील अंजनेरी येथील ‘मिनल आर्ट्स एन्ग्रेव्हर्स’ कार्यशाळेत युवा मूर्तिकार समीर मैंद आणि सुयोग मैंद यांनी हा पंचधातूचा कळस साकारला. पारंपरिक शिल्पकलेला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देत अत्यंत बारकाईने ही कलाकृती घडविण्यात आली. सोमवारी (ता. १६) दुपारी हा कळस गडाकडे रवाना करण्यात आला आणि बुधवारी त्याचे भव्य आगमन झाले.सप्तशिखरांवर विराजमान आद्यशक्ती

‘सप्त ’ म्हणजे सात आणि ‘शिखर’ म्हणजे डोंगररांगा—अशा सात डोंगररांगांच्या मध्यभागी अधिष्ठित असलेली श्री सप्तश्रृंगी देवी शक्ती, संरक्षण आणि कल्याणाचे प्रतीक मानली जाते. या सात शिखरांच्या आध्यात्मिक ऊर्जेचे प्रतीक म्हणून हा नवा पंचधातूचा कळस म्हणजे जणू देवीच्या मुकुटातील तेजस्वी किरीटच ठरत आहे.

सात टप्पे – सप्तचक्रांचे प्रतीकनूतन कळसाची रचना सात टप्प्यांत विभागलेली असून ती ‘सप्तचक्रां’चे प्रतीक मानली जाते. पायथ्याशी असलेले पुष्पाकृती नक्षीकाम, त्यावरील संतुलित रचना आणि सूक्ष्म कोरीव काम ही या कळसाची वैशिष्ट्ये आहेत. श्रद्धा, परंपरा आणि आधुनिकतेचा सुरेख संगम यात दिसून येतो. जुन्या परंपरेला नवे तेजसन १९९२–९३ मध्ये शरद मैंद यांनी साकारलेला जुना कळस नव्या कळसात समाविष्ट करण्यात आला आहे. त्यामुळे परंपरेचा सन्मान राखत आधुनिक वैभवाची जोड देण्यात आली आहे. हा क्षण अनेकांसाठी भावनिक ठरला.

मंदिराच्या शिखरावर कळस बसविण्याची तयारी अंतिम टप्प्यात असून, विशेष मुहूर्तावर मंत्रोच्चार, पूजा-अर्चा आणि धार्मिक विधींनी कळसारोहण सोहळा पार पडणार आहे. देशातील नामवंत साधू-महंत आणि मान्यवरांच्या उपस्थितीत हा ऐतिहासिक सोहळा साजरा केला जाणार आहे- .विश्वस्त अँड. ललित निकम ,

यावेळी देणगीदार भाविक शांताराम सदगीर यांनी कळसारोहणासाठी रोख ५१ हजारांची देणगी दिली. ट्रस्टचे अध्यक्ष तथा जिल्हा सत्र न्यायाधीश अभय लाहोटी, विश्वस्त डॉ. प्रशांत देवरे, भूषण तळेकर, मनज्योत पाटील, अँड. ललित निकम, दीपक पाटोदकर, तहसीलदार रोहिदास वारुळे, कार्यकारी अधिकारी भगवान नेरकर, जनसंपर्क अधिकारी भिकन वाबळे, कार्यालयीन अधीक्षक प्रकाश जोशी, तसेच ग्रामपंचायत पदाधिकारी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पु. साने गुरुजी विद्यामंदिर विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ

## स्वतःच्या नावासह शाळेचे नाव उज्वल करण्यासाठी विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास

**नायगाव : (समर्थ गांवकरी)**

पुज्य साने गुरुजी विद्यामंदिर देगाव येथे मंगळवार दिनांक १७ फेब्रुवारी रोजी इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचा सेंडऑफ निरोप समारंभ अत्यंत उत्साहपूर्ण आणि भावनिक वातावरणात संपन्न झाला असून या

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे संचालक तथा शालेय समिती अध्यक्ष रावसाहेब पाटील मोरे हे होते.तर प्रमुख अतिथी म्हणून संस्थेच्या सहसचिव श्रीमती जयमाला पटने , तसेच शिक्षण विस्तार अधिकारी उद्धव ढगे कुंटुर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक विशाल भोसले मुक्रमाबाद पोलीस स्टेशनचे उपनिरीक्षक शंकर धनाजी मोरे,शाळेच्या माजी मुख्याध्यापिका सौ. गोदावरीताई



इबिते, जि.प. कन्या शाळेचे मुख्याध्यापक आनंद रेनगुंटवार जयराम आंबेकर विद्यालय अर्जापुरचे मुख्याध्यापक सुभाष देगलुरकर यांची आवर्जून उपस्थिती लाभली. तसेच प्रमुख उपस्थिती म्हणून सेवानिवृत्त शिक्षक उमाकांत धुळेकर देगाव नगरीचे माजी सरपंच नामदेव चिंचलवाड,माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष प्रा. अशोक कुमनाळे,कोषाध्यक्ष गोविंद उपासे यांची उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन श्रीमती सुनिताताई मुंगडे यांनी सुंदर व प्रभावीपणे केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक लक्ष्मण कोंडावार यांनी केले.आजपर्यंतचा शाळेचा प्रवास,शाळेच्या विकासासाठी लागलेले अनेकांचे योगदान याविषयी माहिती दिली कै.गंगाधरराव पटणे यांनी शाळेच्या लावलेल्या रोपट्याचे वटवृक्षात रुपांतर झाले असून आज पटणे साहेबांची उणीव भासत असल्याचा आवर्जून त्यांनी उल्लेख केला.

कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण म्हणजे शाळेचे माजी विद्यार्थी शंकर धनाजी मोरे (पोलीस उपनिरीक्षक,मुक्रमाबाद) यांचा शाळेतर्फे मानचिन्ह देऊन यथोचित सन्मान करण्यात आला. एका सामान्य कुटुंबातून शिक्षण घेऊन जिद्दीच्या बळावर यश संपादन केलेल्या त्यांच्या कार्याचा गौरविण्यात आले

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना उद्धव ढगे, विशाल भोसले श्रीमती जयमाला पटने , आनंद रेनगुंटवार, सुभाष देगलुरकर, उमाकांत धुळेकर प्रा.अशोक कुमनाळे तसेच सौ. गोदावरीताई इबिते यांनी विद्यार्थ्यांना परिश्रम, शिस्त, सातत्य आणि आत्मविश्वास यांचे महत्त्व पटवून दिले."मोठी स्वप्ने पाहा आणि ती पूर्ण करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करा," असा संदेश त्यांनी दिला. सर्व मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी शाळेला डायस भेट देऊन कृतज्ञता व्यक्त केली. हा क्षण उपस्थितांसाठी अत्यंत भावनिक आणि संस्मरणीय ठरला.

कार्यक्रमाचा समारोप अध्यक्षीय भाषणातून रावसाहेब मोरे यांनी केला.त्यांनी विद्यार्थ्यांना आत्मविश्वासाने पुढील वाटचाल करण्याचे आवाहन केले शाळेच्या प्रगतीसाठी सर्वांनी एकजुटीने कार्य करण्याचे प्रतिपादन केले.तर शिक्षक आणि विद्यार्थी यांच्या परिसरामुळे हा समारंभ पार पडला आहे.

# मीनाक्षी मिश्रा यांचा मानाचा सन्मान!

- आशियातील सर्वोत्तम शिक्षिका पुरस्काराने संगमनेरचा मान उंचावला!

**संगमनेर : (समर्थ गांवकरी)**

शिक्षण क्षेत्रात दूरदृष्टी, नवोपक्रम आणि सर्वांगीण विकासाचा ठसा उमटविणाऱ्या मीनाक्षी मिश्रा, प्राचार्य पोदार इंटरनॅशनल स्कूल संगमनेर यांना हमिंगन बर्ड एज्युकेशन लिमिटेड यांच्या वतीने प्रदान करण्यात येणारा प्रतिष्ठेचा एशियाज फिनेस्ट एज्युकेशन अवार्ड (Asia's Finest education award) बहाल करण्यात आला आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशामुळे संगमनेर शहरासह संपूर्ण जिल्ह्यात अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे. शैक्षणिक उत्कृष्टतेचा ध्यास, गुणवत्तापूर्ण अध्यापन पद्धतींची प्रभावी अंमलबजावणी आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण



जडणघडणीसाठी सातत्यपूर्ण प्रयत्न या बाबींची दखल घेऊन त्यांना या पुरस्काराने गौरविण्यात आले. श्रीमती मिश्रा यांच्या सक्षम नेतृत्वाखाली शाळेत आधुनिक तंत्रज्ञानाधारित शिक्षण, मूल्यसंस्कारांवर आधारित उपक्रम, कौशल्यविकास कार्यक्रम तसेच शिस्तबद्ध व सकारात्मक शैक्षणिक वातावरण निर्माण करण्यात यश आले आहे. शाळेची शैक्षणिक गुणवत्ता, सहशालेय उपक्रमांतील उल्लेखनीय यश तसेच विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला दिलेले प्राधान्य यामुळे संस्था सतत प्रगतीच्या मार्गावर आहे. त्यांच्या कार्यशैलीत दूरदृष्टी आणि संवेदनशीलता यांचा सुंदर संगम दिसून येतो. शिक्षकांना प्रेरणा देत त्यांच्यातील क्षमता विकसित करण्यावर त्यांनी विशेष भर दिला आहे. पालकांसोबत सशक्त संवाद आणि सहकार्याची भूमिका त्यांनी जपली असून, शाळा-घर यांच्यातील समन्वय अधिक दृढ केला आहे. परिणामी विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, नेतृत्वगुण आणि सामाजिक बांधिलकी विकसित होत आहे. पुरस्कार स्वीकारताना श्रीमती मिश्रा यांनी अत्यंत नम्रपणे हा सन्मान संपूर्ण शाळा परिवाराला अर्पण केला. "हा पुरस्कार माझ्या एकट्याचा नसून विद्यार्थ्यांचे अथक परिश्रम, शिक्षकांची निष्ठा आणि पालकांचा अढळ विश्वास यांचे एकत्रित फलित आहे.

# केमिकल ड्रमने भरलेल्या कंटेनरने ठोकली वाहने

- कंटेनर चालकावर गुन्हा दाखल, पोलिसांनी घेतले चालकाला ताब्यात

**टिटवाळा : (समर्थ गांवकरी)**

टिटवाळ्याजवळील बल्याणी परिसरातून एक केमिकल चे ड्रम भरून सुसाट येणाऱ्या कंटेनर चालकाने बल्याणीतील आस्था बिल्डिंग समोर उभ्या असलेल्या एका डॉक्टरांच्या वॅगनर चारचाकीला ठोकल्याने सदरील कंटेनर चालकाला पकडण्यासाठी काही दुचाकी स्वार त्याच्या मागे लागल्याने कंटेनर चालकाने आपले वाहन भरधाव चालवित मांडा पूर्वेतील विद्यामंदीर शाळेच्या समोरील अरुंद रस्त्याने अनेक वाहनाना धडक देत कशाचीही परवा न करता भरधाव कंटेनर मांडा बाजार पेठेतून नेल्याने त्या गाडीच्या अपघातात अनेक दुचाकी,रिक्षा तसेच इतर वाहनांना अपघात केला. सुदैवाने या अपघातात कोणत्याही प्रकारची जीवितहानी



झाली नाही. मात्र अनेक वाहनांचे नुकसान झाले. सदरील कंटेनर चालकाने रस्त्यावरील डिव्हायडर वरून गाडी चालवित नेली. दरम्यान अनेक नागरिकांनी त्याचा पाठलाग केल्यावर अखेर डी.जी.वन परिसरात त्याला पकडून पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. गजेंद्र भागीराम बिश्नोई (वय 41) असे कंटेनर चालकाचे नाव असून तो आर.जे. 19 जि.जी 4670 या क्रमांकाच्या कंटेनर मधून संपूर्ण केमिकल भरलेले ड्रम घेऊन तो चालला होता. सदरील सुसाट असलेल्या कंटेनर चालकाने कशाचीही पर्वा न करता निष्काळजी पणाने वाहन चालवून अनेक गाड्यांचे नुकसान केले. सदरील अपघाता वेळी नागरिकांची एकच पळापळ झाली. रिक्षाचालक आपल्या रिक्षा सोडून पळाले,दुचाकी स्वार ही या अपघातात जखमी झाले. सकाळी सव्वा अकरा वाजताच्या दरम्यान सदरील अपघात झाला. याबाबत टिटवाळा पोलिसांनी कंटेनर चालकाला ताब्यात घेऊन 147/2026 नुसार त्याच्यावर गुन्हा दाखल करीत त्याला अटक केले. टिटवाळा परिसरातील हा सर्वात मोठा अपघात झालेला असून दैव बलवत्तर म्हणून यात कुणाच्याही जीवाला धोका निर्माण झालेला नाही. याच रस्त्यावर असलेल्या मांडा विद्यामंदिर,शकुंतला या शाळा असल्याने शाळा भरताना किंवा सुटल्यावर शाळकरी विद्यार्थ्यांची व वाहनांची मोठ्या प्रमाणात गर्दी होत असते.

# कलिंगड पिकातून लाखोंची कमाई

**श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)**

श्रीगोंदा तालुक्यातील कोकणगाव येथील प्रगतशील शेतकरी गणेश भाऊसाहेब भालेराव यांनी जिद्द, नियोजन आणि परिश्रम यांच्या जोरावर कलिंगड पिकातून लाखोंची कमाई करत यश मिळविले आहे. योग्य दर मिळाल्याने त्यांच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य फुलले आहे. गणेश भालेराव व त्यांचे बंधू नंदू भालेराव या दोघा भावांनी अत्यंत मेहनतीने एक एकर क्षेत्रावर कलिंगडाचे पीक घेतले. बदलते हवामान, अतिवृष्टी, गारपीट, अवेळी पाऊस अशा विविध संकटांना तोंड देत त्यांनी पीक जोपासले आणि अखेर ते बाजारपेठेत यशस्वीपणे पोहोचविले. सुमारे एक एकर क्षेत्रातून त्यांनी तब्बल ३० टन कलिंगड उत्पादन घेतले.

# पाणी टंचाई आढावा बैठक आ. चिखलीकर यांच्या उपस्थितीत संपन्न

- सरपंचांचे तसेच नागरिकांचे मागण्या ऐकून संबंधित अधिकाऱ्यांना उपाययोजना करण्याचे आदेश

**कंधार : (समर्थ गांवकरी)**

कंधार येथील पाणीटंचाई आढावा बैठक लोहा- कंधार विधानसभेचे लोकप्रिय आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या उपस्थितीत कंधारच्या पंचायत समिती सभागृहात संपन्न झाली. या बैठकीस कंधार येथील अनेक सरपंच तसेच नागरिकांची उपस्थिती होती. आलेल्या मतदारसंघातील नागरिकांच्या पाणी टंचाई मागण्या तसेच इतर समस्या आमदार महोदयांनी ऐकून घेतल्या , त्यामध्ये गावातील पाणी पाईपलाईन, बोरअधिग्रहण, विहीर, शेतीच्या पाणी विषयक समस्या त्याचप्रमाणे विजेच्या



समस्या तसेच ग्रामपंचायती मधील इतर समस्येवर तातडीने उपाययोजना करण्याचे आदेश संबंधित अधिकाऱ्यांना आयोजित पाणीटंचाई कृती आराखडा आढावा बैठकीत त्या त्या विभागांना दक्ष राहण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

तालुक्यातील विविध गावांतील पाणीपुरवठा योजनांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. गावनिहाय विहिरी व बोअरवेलची सद्यस्थिती, उपलब्ध जलसाठा, भूजल पातळीतील घट याची माहिती सादर करण्यात आली. तसेच काही भागात टँकरद्वारे पाणीपुरवठ्याची आवश्यकता भासू शकते, यावर चर्चा करण्यात आली. जलस्रोतांचा प्रभावी व काटेकोर वापर, बंद पडलेल्या पाणीपुरवठा योजनांची तातडीने दुरुस्ती, पर्यायी स्रोत उपलब्ध करून देणे आणि आवश्यक त्या ठिकाणी आगाऊ नियोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या. प्रशासन व ग्रामपंचायतींनी समन्वय ठेवून काम केल्यास पाणीटंचाईची समस्या मोठ्या प्रमाणात टाळता येईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर पाणीप्रश्न गंभीर होऊ नये, यासाठी प्रभावी नियोजन व तत्पर अंमलबजावणीवर भर देण्यात याव्यात अशा ही सूचना करण्यात आल्या. यावेळी पंजाबराव जोगदंड,प्रवीण पाटील चिखलीकर,बाबुराव गिरे,किशन डफडे,उपनगराध्यक्ष मन्नान चौधरी,सुधाकर कौशल्य,चंदनफुले,भगवान राठोड,अविनाश गीतेसह आजी/माजी ग्रामसेवक संघटनेचे अध्यक्षासह तालुक्यातील ग्रामपंचायतचे सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक व पत्रकार , अधिकारी - कर्मचारी तसेच असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

# संत शेख महंमद महाराज यात्रेच्या पार्श्वभूमीवर आढावा बैठक

**श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)**

श्री संत शेख महंमद महाराज यात्रेच्या नियोजनासाठी आज तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी कार्यालय, श्रीगोंदा येथे सर्व संबंधित विभागांची संयुक्त आढावा बैठक पार पडली. यात्रेदरम्यान कायदा व सुव्यवस्था, स्वच्छता, वाहतूक, पार्किंग, पाळणे, तमाशा कार्यक्रम व सुरक्षाविषयक उपाययोजनांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

यात्रेकरूंच्या वाहनांसाठी स्वतंत्र पार्किंग व्यवस्था उभारणे, परिसराची नियमित साफसफाई करणे तसेच गर्दी नियंत्रणासाठी विशेष नियोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या. पाळणाधारकांसाठी यंदा कडक नियम लागू करण्यात आले आहेत. नगरपरिषदेची 'ना हरकत', पोलिस स्टेशनची 'ना हरकत', अग्निशमन विभागाची परवानगी, सार्वजनिक बांधकाम विभागाची परवानगी,



पाळण्याचा स्ट्रक्चरल फिटनेस अहवाल, विमा (इन्शुरन्स) तसेच जागामालकाचे 'ना हरकत' प्रमाणपत्र अनिवार्य राहणार आहे. संबंधित कागदपत्रांशिवाय पाळणा उभारण्यास परवानगी दिली जाणार नाही; नियमांचे उल्लंघन केल्यास कारवाई करण्यात येईल, असे तहसील प्रशासनाने स्पष्ट केले.

पाळण्यांचे दर यात्रा कमिटी व पाळणाधारक यांच्या परस्पर बैठकीत निश्चित करण्यात यावेत, असेही ठरविण्यात आले. यात्रेत केवळ पारंपरिक वाद्यांनाच परवानगी देण्यात येणार असून बारावीच्या परीक्षा सुरू असल्याने डीजे गाड्यांवर कारवाई करण्यात येईल, अशी माहिती किरण शिंदे यांनी दिली.

यात्रेदरम्यान कोणतेही बॅनर किंवा फ्लेक्स लावण्यास मनाई करण्यात आली आहे, अशी माहिती नगरपरिषदेकडून शांतता बैठकीत देण्यात आली. नगर परिषद श्रीगोंदा यांच्या मुख्याधिकारी भगत मॅडम यांनी यात्रामार्गावर बसणाऱ्या खेळणी व इतर लघुविक्रेत्यांकडून कोणतेही शुल्क आकारले जाणार नसल्याचा पालिकेचा ठराव असल्याचे स्पष्ट केले.

तमाशा कार्यक्रमांसाठी श्रीगोंदा पोलिस स्टेशन येथे नियमानुसार अर्ज सादर केल्यानंतर पोलिस बंदोबस्त उपलब्ध करून दिला जाईल, जेणेकरून अनुचित प्रकार टाळता येतील, असेही सांगण्यात आले. संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी आवश्यक खबरदारी घेतली जात असून आपत्कालीन परिस्थितीचा विचार करून तहसील आवारात एक ॲम्ब्युलन्स कायमस्वरूपी तैनात ठेवण्यात येणार आहे. सोन्याचे वाढलेले दर आणि संभाव्य चोरीच्या घटनांचा विचार करता यात्रास्थळी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली. शांतता बैठकीत उपअधीक्षक लोखंडे (कर्जत) यांनी विविध विषयांवर मार्गदर्शन केले.

# स्काऊट शिबिराचे आयोजन

**श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)**

महादजी शिंदे विद्यालय, श्रीगोंदा व हिरडगाव समस्त ग्रामस्थ यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २४ ते २६ फेब्रुवारी दरम्यान भव्य स्काऊट शिबिर मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. कर्मवीर भाऊराव पाटील पथकाचा हा त्रिदिवसीय शिबिर मेळावा जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, हिरडगाव येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडणार आहे. या शिबिराचे अध्यक्ष म्हणून माजी मंत्री बबनराव पाचपुते उपस्थित राहणार असून प्रमुख पाहुणे म्हणून श्रीगोंदा नगरपालिकेच्या नगराध्यक्ष सुनीताताई खेतमाळीस, उपनगराध्यक्ष अलकाताई अनभुले, स्काऊट प्रौढ संसाधन जिल्हा आयुक्त काशिनाथ बुचुडे तसेच जिल्हा सहाय्यक आयुक्त तथा शिक्षण विस्तार अधिकारी निळकंठ बोरुडे उपस्थित राहणार आहेत.

# श्री क्षेत्र घुटकेश्वर महादेव मंदिर वाकडपाडा येथे महाशिवरात्री निमित्त भाविकांची गर्दी

**पालघर: (समर्थ गांवकरी)**

मोखाडा तालुक्यातील वाकडपाडा येथील प्राचीन शिवमंदिरात श्री घुटकेश्वर महादेवाचे दर्शन घेण्यासाठी परीसरातील भाविकांनी आज सकाळपासून च गर्दी केली आहे.

भजन किर्तन स्वाध्याय परिवार कार्यक्रमाचे आयोजन मंदिर समितीने केले असल्याची माहिती घुटकेश्वर महादेव मंदिर समितीचे अध्यक्ष प्रदीप वाघ यांनी सांगितले.

सकाळी परीसराती दिंड्या हरहर महादेव चा जयघोष करत या तिर्थक्षेत्रात येतात, भाविकांच्या जयघोषात महाअभिषेक, महाआरती करण्यात आल्याने आज घुटकेश्वर मंदीराचा परीसर शिवमय झाला होता.

हे तिर्थक्षेत्र प्राचिन काळापासून चे आहे, महाराष्ट्र शासनाच्या तिर्थक्षेत्र विकास योजनेतून या



ठिकाणी अनेक विकासकामे करण्यात आली असल्याची माहिती समिती चे अध्यक्ष प्रदीप वाघ यांनी दिली आहे का

आज परीसरातील अनेक व्यावसायिकांनी फराळ,खेळणी,गृह उपयोगी वस्तू चे स्टॉल लावण्यात आले होते त्यामुळे यात्रेच्या निमित्ताने आलेल्या भाविकांनी खरेदीचा आनंद देखील घेतला.

# हिमायतनगर शहरात अवैध धंदे जोमात पोलीस यंत्रणा कोमात ?

**हिमायतनगर: (समर्थ गांवकरी)**

हिमायतनगर शहरासह ग्रामीण भागात सध्या च्या परिस्थितीत सर्व परिसरात अनेक ठिकाणी चौका चौकात मटका जुगार आणि देशी दारू विक्री जोमात प्रशासन मात्र कोमात असल्याचे दिसते कारण विकणाऱ्यांची संख्या वाढली आहे बहुतांश लोक व्यसनाच्या आहारी गेल्यामुळे त्यांच्या संसारात उध्वस्त होण्याची वेळ अनेक परिवारावर आली आहे ओपन जेऊ दे ना क्लोज झोपू दे ना. मटका जुगार वर देशी दारू राजरोसपणे चालू आहे पण पोलिसांचे अर्थपूर्ण दुर्लक्ष आहे दारूच्या आहारी युवा पिढी जाऊन अतिशय घरादाराचे नुकसान होत आहे अनेकांचे संसार उध्वस्त होत आहे पण दारू विक्री काही कमी होत नाही. देशी दारू चे बॉक्स तर खुले आम बाजारात



विक्री केली जात आहेत यामध्ये काही एजंट पण दारू विक्री करत आहेत. या सर्व बाबीवर पोलिसांचे लक्ष असून सुद्धा अर्थपूर्ण दुर्लक्ष पोलीस प्रशासन करीत असल्याचे दिसत आहे तर सर्व सामान्य जनता ह्या गोष्टीवर आळा बसेल का आणि जिल्हा पोलीस अधीक्षक यांनी या बाबीकडे लक्ष देऊन हे चालणारे अवैद्य धंदे बंद करून सर्व सामान्य परिवाराचे उध्वस्त होणाऱ्या संसाराकडे लक्ष द्यावे हि हिमायतनगर परिसरातील जनतेची मागणी आहे.

# काष्टीत भरधाव पिकअपच्या धडकेत दोन सख्ख्या भावांचा दुर्दैवी मृत्यू

**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**

आपल्या भावाला पहाटे चार वाजता कामावर जाण्यासाठी सोडायला जात असताना भरधाव पिकअपने दुचाकीला जोरदार धडक दिल्याने या अपघातामध्ये संतोष शिवाजी माने (वय 45) आणि त्यांचे लहान बंधू सचिन शिवाजी माने (वय 42) राहणार काष्टी (गजाननवाडी) ता.श्रीगोंदा या दोन्ही संख्या भावांचा जागीच मृत्यू झाल्याने संपूर्ण गावावर शोककळा पसरली आहे. सविस्तर माहिती अशी कि मंगळवार दि.17 रोजी पहाटे चारच्या सुमारास सचिन माने हे पुणे जिल्ह्यातील शिरुर कारेगाव येथील एका कंपनीत कार्यरत होते. कंपनीची बस काष्टी गावातील दत्त मंदिर परिसरात येत असल्याने सचिन यांना कामावर जाण्यासाठी



बसच्या ठिकाणी सोडण्यासाठी त्यांचे मोठे बंधू संतोष माने हे दुचाकीवरून त्यांना सोबत घेऊन जात असताना पहाटे सुमारे ४ वाजण्याच्या सुमारास काष्टी गावात नगर-दौंड महामार्गावर श्रीगोंदा चौकात ( वाघजाई चौक ) माने बंधूंच्या दुचाकीला दौंड कडून नगरकडे जाणाऱ्या भरधाव पिकअपने जोराची धडक दिली. धडक इतकी जोरात होती कि यामध्ये संतोष आणि सचिन दोघा भावांचा जागीच मृत्यू झाला. अपघातानंतर पिकपगाडी निघून गेली. अपघाताचा संपूर्ण थरार ग्रामपंयतीच्या सीसीटीव्ही कॅमेरा मध्ये दिसत आहे. घटनेनंतर पहाटे व्यायामासाठी जाणाऱ्या स्थानिक नागरिकांनी श्रीगोंदा पोलिसांना माहिती दिली. दोन्ही मृतदेह रुग्णवाहिके मधून श्रीगोंदा येथे ग्रामीण रुग्णालयात श्ववविच्छेदनासाठी दाखल करुण

रात्री उशीरा घोडनदीतिरी संतोष आणि सचिन यांच्यावर शोकाकूल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. अंत्यविधीला मोठ्या संख्येने जनसमुदाय हजर होता.

संतोषच्या मागे पत्नी, एक मुलगा,दोन मुली, तर सचिनच्या मागे पत्नी महाराष्ट्र पोलीस रुपाली माने,दोन मुली,एक मुलगा, तसेच आई अंगणवाडी सेविका मंगल माने व वडील असे एकत्र कुटुंब आहे.

संतोष आणि सचिन दोघे भाऊ अतिशय शांत गरिब स्वाभाचे असल्याने त्यांच्या या अकाली अपघाती जाण्याने काष्टी गावावर शोककळा पसरली असून अपघातानंतर काष्टी ग्रामस्थ आक्रमक झाले आहेत. झालेल्या दुर्दैवी या घटनेमुळे तालुक्यामध्ये सर्व स्तरातून हळहळ व्यक्त होत आहे . या घटनेचा पुढील तपास श्रीगोंदा पोलीस करत आहे.

काष्टी हे गाव नगर-दौंड महामार्गावर आहे. तसेच याच गावातून चाकन बीड हा महामार्ग जातो.आणि दोन्ही महामार्गाचा मिलाप वाघजाई चौक आहे.

## मुलांचा मृतदेह पाहून कुटुंबाचा आक्रोश

काष्टी गजाननवाडी येथील रहिवासी शिवाजी माने हे जुन्या पिढ सायकल दुकानदार आहेत. तर आई मंगल माने अंगणवाडी सेविका अतिशय प्रतिकुल परिस्थिती मध्ये मुलांना शिक्षण देवून घडवले. आज घरातील परिस्थिती मुल हाताखाली आल्याने बदलत चालली होती.परंतु नियतिला ते मान्य नव्हते का ? झालेल्या अपघातामध्ये पोटची दोन्ही मुल गेली. दोन्ही मुलांचे मृतदेह घरी आल्यानंतर आईवडीलांचा,पत्नीचा,मुलांचा एकच आक्रोश पाहून सर्वाच्याच डोळ्यात आसुचा बांध फुटला.